- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,५३,७०० /-
✔ २३ कॅरेट : १,५१,३५० /-
✔ चांदी : २,४८,३००/-

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, १ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २९२ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# एमएसपी वाढीसह २.७९ लाख कोटींच्या पॅकेजला मंजुरी

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या निर्णयांचे एकूण आर्थिक मूल्य तब्बल २.७९ लाख कोटी रुपये आहे. यामध्ये शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेत रबी हंगामातील सहा पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीने मार्केटिंग सीझन २०२७-२८ साठी गहू, बार्ली, हरभरा, मसूर, मोहरी आणि करडई या सहा रबी पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, या वाढीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला अधिक चांगला भाव मिळण्यास मदत होईल.



रबी पिकांमध्ये करडईच्या एमएसपीमध्ये सर्वाधिक ६७५ रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे करडईची नवीन एमएसपी ७,२१५ रुपये प्रति क्विंटल झाली आहे. तर गव्हाच्या एमएसपीमध्ये सर्वात कमी २५ रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे. गव्हाची नवीन एमएसपी आता २,६१० रुपये प्रति क्विंटल असेल.

**केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती**
केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, अखिल भारतीय सरासरी उत्पादन खर्चाच्या तुलनेत गव्हासाठी अंदाजे १०६ टक्के मार्जिन मिळेल. मोहरीसाठी हे प्रमाण ९६ टक्के, मसुरीसाठी ९२ टक्के, हरभऱ्यासाठी ५९ टक्के, बालीसाठी ५८ टक्के आणि करडईसाठी ५० टक्के आहे. सरकारच्या मते, एमएसपी वाढीमुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत चांगला भाव मिळण्यास मदत होईल. तसेच वेगवेगळ्या पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन मिळून पीक विविधीकरणालाही चालना मिळू शकते.

**पीएम धारा योजनेलाही मंजुरी**
केंद्रीय मंत्रिमंडळाने ऊर्जा क्षेत्राशी संबंधित पीएम धारा या कार्यक्रमालाही मंजुरी दिली आहे. देशात अक्षय ऊर्जेचा वापर वाढत असताना त्यासाठी आवश्यक असलेली वीज वाहून नेणारी यंत्रणा आणि स्मार्ट ग्रिड सुविधा मजबूत करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, देशाच्या वीज निर्मितीत अक्षय ऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर समावेश करण्यासाठी केंद्र सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. या प्रकल्पासाठी तब्बल १,८६,४०५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**दिल्लीमध्ये स्मार्ट ट्रॅफिक व्यवस्था**
केंद्रीय मंत्रिमंडळाने दिल्लीसाठी बुद्धिमान वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (आयटीएमएस) लागू करण्यासही मंजुरी दिली आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने राजधानीतील वाहतूक व्यवस्थेवर अधिक प्रभावीपणे लक्ष ठेवता येणार आहे. वाहतूक कोंडी कमी करणे, रस्त्यावरील सुरक्षितता वाढवणे आणि वाहनांची ये-जा अधिक चांगल्या पद्धतीने नियंत्रित करणे यासाठी या प्रणालीचा वापर केला जाणार आहे. दिल्लीतील या प्रकल्पासाठी अंदाजे १,७९० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**तीन निर्णयांसाठी २.७९ लाख कोटींचा खर्च**
केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या या तीन निर्णयांची एकूण आर्थिक किंमत २,७९,१५७ कोटी रुपये आहे. यापैकी रबी पिकांच्या एमएसपी वाढीसाठी अंदाजे ९०,९६२ कोटी रुपये, पीएम धारा कार्यक्रमासाठी १,८६,४०५ कोटी रुपये, तर दिल्लीच्या प्रकल्पासाठी १,७९० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या निर्णयांमध्ये शेतकऱ्यांसाठी एमएसपी वाढ, देशाच्या अक्षय ऊर्जा व्यवस्थेला चालना आणि दिल्लीतील वाहतूक व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा वापर अशा तीन महत्त्वाच्या क्षेत्रांवर सरकारने भर दिला आहे.

**रबी पिकांच्या एमएसपीमधील वाढ**
गहू : नवीन एमएसपी २,६१० प्रति क्विंटल – २५ वाढ
बार्ली (जव): नवीन एमएसपी २,२८६ प्रति क्विंटल – १३६ वाढ
हरभरा: नवीन एमएसपी ५,९५८ प्रति क्विंटल – ८३ वाढ
मसूर : नवीन एमएसपी ७,३९० प्रति क्विंटल– ३९० वाढ
मोहरी : नवीन एमएसपी ६,६१३ प्रति क्विंटल – ४१३ वाढ
करडई : नवीन एमएसपी ७,२१५ प्रति क्विंटल – ६७५ वाढ

थोडक्यात

## मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु

**मुंबई** : देशात यावर्षी सरासरीपेक्षा १३ टक्के पाऊस कमी झाल्याची माहिती भारतीय हवामान विभागानं दिली आहे. २०२६ च्या मान्सूनमध्ये देशभरात ८७ टक्के पाऊस झाला आहे. देशात जून ते सप्टेंबरदरम्यान ७५९.४ मिमी पावसाची नोंद झाल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. २००१ नंतरचा चौथा, तर १९०१ नंतरचा १३ वा सर्वात कमी पाऊस झाला आहे. शान्य भारतात १९०१ नंतरचा सर्वात कमी पाऊस झाल्याची माहिती भारतीय हवामान विभागानं दिली आहे. दक्षिण द्वीपकल्पात १९०१ नंतरचा चौथा सर्वात कमी पाऊस झाला आहे. मध्य भारतात मात्र सामान्य पावसाची नोंद झाली आहे. देशातील ३६ पैकी १७ हवामान विभागांमध्ये पावसाची तूट झाली आहे. १८ हवामान विभागांमध्ये सामान्य पाऊस, ओडिशात अतिवृष्टी असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. मान्सून कोअर झोनमध्ये ७७९.९ मिमी पाऊस झाला आहे. सामान्य पावसाच्या किमान मर्यादेपेक्षा कमी पाऊस झाला आहे. जूनमध्ये ६५ टक्के, जुलैमध्ये १०१ टक्के ऑगस्टमध्ये ८४ टक्के तर सप्टेंबरमध्ये ९२ टक्के पाऊस झाला आहे. १६ मे रोजी अंदमान- निकोबारमध्ये मान्सूनचे आगमन झाले होते. तर ४ जून रोजी केरळमध्ये मान्सून दाखल झाला होता. तर ९ जुलैपर्यंत संपूर्ण देश मान्सूनने व्यापला होता. १९ सप्टेंबरपासून राजस्थानातून मान्सूनच्या परतीला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रात देखील बहुतांश भागात पाऊसच झाला नाही. सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. पावसाचे चारही महिने कोरडेच गेले आहेत.

# समुद्रात अडकलेल्या जहाजावर चोरी करण्याच्या नादात चौघांनी गमावला जीव

**वृत्तसंस्था, मुंबई**
गोराई- मनोरीच्या समुद्रकिनाऱ्यावर अडकलेल्या जहाजात चोरी करायला गेलेल्या चार चोरट्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मुंबईच्या बोरिवली पश्चिम गोराई येथील मनोरी बीचवर धक्कादायक घटना घडली आहे. समुद्रात अडकलेली विदेशी जहाजावर चोरी करायला गेलेल्या चार चोरट्यांचा गुदमरुन मृत्यू झाला आहे. चार महिन्यापूर्वी वादळी वाऱ्यासह जोरदार पावसामुळे गोराई येथील मनोरी समुद्रकिनाऱ्यावर विदेशी जहाज येऊन अडकली होती.

या अडकलेल्या जहाजाची माहिती मिळतच मागील महिनाभरापासून या चोरट्याच्या टोळी कडून दररोज चोरी सुरू होती. मात्र दोन ते तीन दिवस पूर्वी या चोरट्याच्या टोळीकडून जहाजीवर गॅस कटरने गॅस पाईपलाईन कापून चोरी करायचे प्रयत्न केला जात होता. यावेळी जहाज मधून विषारी गॅस निघाल्यामुळे चौघा चोरट्यांचा जागेवरच गुदमरून दुर्दैवी मृत्यू झाली आहे.

समुद्रात संधीचा फायदा घेऊन या चोरट्यांकडून जहाजामधून चोरी सुरु होती. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, हे जहाज चार महिन्यांपूर्वी मनोरीच्या समुद्रकिनाऱ्यावर येऊन अडकले होते. जहाजाच्या मालकाविरोधात गुन्हा दाखल असून तो परदेशात फरार असल्याची माहिती समोर आली आहे. या जहाजाचा वापर तेलाशी संबंधित बेकायदेशीर व्यवहारांसाठी केला जात असल्याचा प्राथमिक दावा करण्यात येत आहे. मात्र, या दाव्याची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. दरम्यान, जहाजावर चोरी करण्यासाठी काही चोरट्यांनी यापूर्वी दोन वेळा प्रवेश केल्याची माहिती पोलिसांच्या तपासातून समोर येत आहे.



पहिल्यांदा सुमारे अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल, तर दुसऱ्यांदा सुमारे पाच लाख रुपयांचा मुद्देमाल चोरी केल्याचा दावा आहे. तिसऱ्यांदा चोरी करण्यासाठी आठ जणांची टोळी स्पीडबोटच्या मदतीने जहाजावर गेल्याची प्राथमिक माहिती आहे.

यातील एक जण बोटीवर थांबला, तर सात जण जहाजाच्या आत गेले होते. त्यापैकी चार जण जहाजाच्या आतील भागात पाईप कटिंग करण्यासाठी गेल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, याचवेळी जहाजाच्या आतील भागात गॅस गळती झाल्याचा संशय आहे. गॅस गळतीमुळे चारही जणांचा गुदमरून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच आज गोराई पोलिस आणि स्थानिक भाजप नगरसेवक शिवानंद शेट्टी जहाजीवर जाऊन हेलिकॉप्टर च्या माध्यमातून चारही पार्थिव बाहेर काढले आहेत. सध्या गोराई पोलिसांनी सर्व जप्त केलेल्या पार्थिव जवळचा रुग्णालयमध्ये शवविच्छेदन करण्यासाठी पाठवले आहेत. चोरट्यांची ओळख पटवायचं काम पोलिसांकडून सुरू आहे. त्यासोबत हे समुद्रात कसे पोहचून चोरी करत होते, याचा तपास सुरू आहे.

# गुवाहाटीत धावांचा पाऊस, भारताचा ऐतिहासिक विजय

**वृत्तसंस्था, गुवाहाटी**
गुवाहाटीतील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात अक्षरशः धावांचा पाऊस पडला. दोन्ही संघांच्या फलंदाजांनी गोलंदाजांची अक्षरशः धुलाई करत तब्बल ८११ धावा केल्या. या सामन्यात एक-दोन नव्हे तर ४ शतके आणि एक द्विशतक पाहायला मिळाले. वेस्ट इंडिजकडून शाई होप, जॉन कॅम्पबेल आणि अमीर जांगू यांनी शतक झळकावले तर भारताकडून रोहित शर्माने शतक ठोकत दमदार कमबॅक केले आणि कर्णधार शुभमन गिलने द्विशतक झळकावत इतिहास रचला. या सामन्यात भारताचा ऐतिहासिक विजय झाला.

शुभमन गिलचे द्विशतक आणि




रोहित शर्माच्या शतकाच्या जोरावर भारताने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजवर ८ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने ५० षटकांत ७ गडी गमावून ४०५ धावा केल्या होत्या.

या धावसंख्येचा पाठलाग करताना भारतीय संघाने केवळ ४३.३ षटकांत ४०६ धावा करून विजय मिळवला. या फॉरमॅटमधील भारताचा हा सर्वात मोठा पाठलाग होता. तरीही भारताने सहज विजय मिळविला. या विजयात सलामीवीर रोहित शर्माचे शतक आणि शुभमन गिलचे शतक महत्त्वपूर्ण ठरले.

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने धावांचा डोंगर उभा केला. जॉन कॅम्पबेल, शाई होप आणि अमीर जांगू यांच्या शतकी खेळीच्या जोरावर वेस्ट इंडिजने ५० षटकांत ७ गडी गमावून ४०५ धावा केल्या. ही वेस्ट इंडिजची एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वोच्च धावसंख्या ठरली. विशेष म्हणजे भारताविरुद्ध कॅरिबियन संघाने वनडेत पहिल्यांदाच ४०० धावांचा टप्पा ओलांडला. अमीर जांगूने सर्वाधिक १४४ धावांची खेळी केली.

# विनाआधार दस्तनोंदणी अशक्य

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा महत्वाचा निर्णय, दस्तनोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता, फसवणूक टळणार, खरेदी, विक्री, गहाण खत वाटणीसह ६३ प्रकारच्या नोंदीसाठी आधार ओळख अत्यावश्यक

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
कोणत्याही दस्त नोंदणीसाठी आता आधार ओळखपत्र महसूल विभागाने अनिवार्य करण्यात आले आहे. आधार नसेल तर दस्तनोंदणी होणारच नाही, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

मालमत्ता खरेदी विक्रीतील फसवणूक टाळण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून हा निर्णय घेण्यात आल्याचे महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले. यासंदभार्तील राजपत्र प्रसिद्ध करण्यात आले असून, एक ऑक्टोंबरपासून या निर्णयाची



अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राज्य शासनाच्या महसूल विभागांतर्गत काम करणाऱ्या नोंदणी व मुद्रांक विभागातर्फे स्थावर मालमत्तांच्या दस्तनोंदणीची प्रक्रिया पार पाडली जाते. खोटे साक्षीदार, खोटे पक्षकार उभे करून होणारी फसवणूक आता हद्दपार होईल. यामुळे नोंदणी प्रक्रियेतील मानवी हस्तक्षेप कमी होऊन फसवणुकीचे प्रकार टळतील आणि संपूर्ण कामकाज अधिक कार्यक्षम व पारदर्शक होण्यास मदत होईल.

ताटलीत, ज्यांचा आधार क्रमांक नाही त्यांनी आधार नोंदणी केल्याची पावती व त्यासोबत अन्य सरकारी ओळखपत्रे तसेच व्यवहार होत असलेल्या संबंधिताचे नाते सिध्द करणारी कागदपत्रे अर्जासोबत जोडावी लागतील. पडताळणी झाल्यानंतरच व्यवहार अंतिम होणार आहे.

**बालकांसाठी व विशेष घटकांसाठी नियम**
१८ वर्षाखालील मुलांच्या बाबतीत त्यांच्या माता-पिता किंवा कायदेशीर पालकांच्या संमतीनेच आधार नोंदणी अर्ज केला जाईल. केवळ आधार क्रमांक उपलब्ध नसल्याच्या कारणावरून कोणत्याही बालकाला किंवा पात्र लाभार्थ्यार्ला दस्तनोंदणीच्या लाभापासून वंचित ठेवले जाणार नाही, अशी स्पष्ट तरतूद या अधिसूचनेत करण्यात आली आहे.

# दिल्ली विमानतळावर १० अत्याधुनिक डिफेन्स ड्रोन्स जप्त

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क विभागाने (कस्टम्स) तस्करीचा मोठा कट उधळून लावला आहे. व्हिएतनाममार्गे हाँगकाँगहून आलेल्या तीन भारतीय प्रवाशांकडून १ कोटी ३ लाख रुपयांहून अधिक किमतीचे १० व्यावसायिक आणि संरक्षण दर्जाचे अत्याधुनिक ड्रोन्स जप्त करण्यात आले आहेत. या तिन्ही प्रवाशांना ताब्यात घेण्यात आले असून कस्टम्स विभागाकडून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.



कस्टम्स अधिकाऱ्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे २५ सप्टेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली. तिन्ही संशयित प्रवासी हाँगकाँगहून व्हिएतनाममार्गे दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील टर्मिनल-३ वर उतरले होते. कस्टम्स तपासणी चुकवण्यासाठी हे प्रवासी बिनदिक्कतपणे ग्रीन चॅनेल ओलांडून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात असताना दबा धरून बसलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना अडवले.

**साहित्याची झडती आणि उच्च तंत्रज्ञानाचे ड्रोन्स उघड**
अधिकाऱ्यांनी प्रवाशांच्या सामानाची कसून झडती घेतली असता त्यांच्याकडे 'ऑटेल रोबोटिक्स एमडीएक्स-१' बनावटीचे १० उच्च तंत्रज्ञानयुक्त व्यावसायिक ड्रोन्स सापडले. याशिवाय, अत्याधुनिक कंट्रोलर्स, कॅमेरा माऊंटेड गिम्बल्स, केबल्स, प्रोपेलर्स आणि जॉयस्टिक्स यांचा समावेश असलेली सहायक उपकरणे हस्तगत करण्यात आली. प्रवाशांच्या सामानातून एक महागडा आयफोन १८ प्रो मॅक्स देखील जप्त करण्यात आला.

संपादकीय लेखणीतून...

# देशभर आंदोलन व निवडणूक आयोग

केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आणि अटकेच्या मागणीसाठी काँग्रेसने सोमवारी देशभरात एल्गार पुकारला. मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) प्रक्रियेतील कथित घोटाळे आणि अंतर्गत गोंधळाच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश, हरियाणा, छत्तीसगड, उत्तराखंडमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांनी तीव्र निदर्शने केली. आग्र्यात मुख्य निवडणूक आयुक्तांच्या घराला काळे फासून, शाईफेक करून ज्ञानेश कुमार गद्दार, मतचोर असे लिहून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. राजस्थानात पायी मोर्चा काढणारे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्यासह कार्यकर्त्यांवर पाण्याचा मारा करून त्यांना ताब्यात घेण्यात आले. निवडणूक आयोगाच्या अंतर्गत रचनेत आणि मतदार याद्यांमध्ये नाव वाढवणे/वगळणे याबाबत इतर दोन निवडणूक आयुक्तांनी (सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी) ज्ञानेश कुमार यांच्या काही एकतर्फी व घाईघाईने घेतलेल्या निर्णयांवर लेखी आक्षेप घेतले होते.

काँग्रेस खासदार राहुल गांधी आणि विरोधी पक्षांचा असा आरोप आहे की, ज्ञानेश कुमार हे इतर आयुक्तांचे न ऐकता मनमानी पद्धतीने काम करत असून त्यांनी विरोधी पक्षांचे मतदार वगळण्याचे घटनाबा पाऊल उचलले आहे, जे देशद्रोहासारखे आहे. या प्रकरणी विरोधी पक्षांनी संसदेत मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध महाभियोग आणण्याची तयारी सुरू केली आहे. लखनौमध्ये काँग्रेस कार्यकर्ते पोलिसांशी भिडले तर काशी, वाराणसीत काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्यांनी बांगड्या घेऊन आंदोलन केले. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत उत्तर प्रदेशात काँग्रेस कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. जयपूरमध्ये शहीद स्मारक येथे सभा झाल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत पायी मोर्चा काढला. मध्य प्रदेशात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या विरोधात भोपाळमध्ये काँग्रेसने जोरदार आंदोलन केले. या दरम्यान पोलिस आणि कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाली. काही कार्यकर्ते बॅरिकेड्सवरही चढले तसेच प्रतीकात्मकरीत्या ज्ञानेश कुमारांना बेड्याही घालण्यात आल्या. बिहार मतचोरीविरोधात बिहारमध्ये काँग्रेसने हल्लाबोल करत पाटणा-औरंगाबादमध्ये आक्रोश मोर्चा काढला.

ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर आणि निवडणूक आयोगाच्या एकूणच कारभारावर गंभीर आक्षेप घेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या वतीने अनेक भागात आंदोलने करण्यात आली. ज्ञानेश कुमार यांना त्वरित पदावरून हटवण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी काँग्रेसचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर अशा अनेक प्रमुख शहरांमध्ये काँग्रेसच्यावतीने जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली, प्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीत सुधारणा न झाल्यास हा लढा अधिक तीव्र करण्याचा इशाराही काँग्रेस नेत्यांनी दिला. ज्ञानेश कुमार यांच्या निर्णयावर दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी तब्बल १४ वेळा आक्षेप नोंदवूनही ज्ञानेश कुमार यांनी हुकूमशाही पद्धत राबविली आहे. हा लोकशाहीचा खून असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीत ठाण्यात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची गाढवावरून प्रतीकात्मक धिंड काढण्यात आली. यावेळी 'एसआयआर हटाओ, देश बचाओ' अशा घोषणा देण्यात आल्या. हिंगोलीत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा ताफा काँग्रेस कार्यकर्त्यांनी सुमारे दहा मिनिटे रोखला.

शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर करावी आणि मुख्य निवडणूक आयुक्तांवर कारवाई करावी, या मागण्यांसाठी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. याच दरम्यान महसूल मंत्र्यांचा ताफा कार्यालयासमोरून जात असताना त्यांचा ताफा रोखण्यात आला. काँग्रेस कार्यकर्त्यांनी यावेळी त्यांना निवेदन दिले. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कारभाराविरोधात विरोधी पक्ष सातत्याने आवाज उठवत आहे. मुख्य निवडणूक आयुक्त विरोधी पक्षांना संपवण्यासाठी केंद्र सरकारचे बाहुले म्हणून काम करत आहेत हे आता उघड झाले आहे. मतदार यादीतील एक नाव वगळणे म्हणजे नागरिकाच्या मतदानाच्या अधिकारावर गदा आणणे आहे. एसआयआरमधून १३ कोटींहून अधिक मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. टी.एन. शेषन यांच्या काळात निवडणूक आयोगाचा जो धाक आणि विश्वास होता तो आता राहिलेला नाही.

# उदंड झालेत साहित्य समूह

**लीलाधर दवंडे**
**कामठी, जि. नागपूर**

देशात सध्या समाज माध्यमांच्या आहारी न गेलेला व्यक्ती क्वचितच सापडेल. लहान थोर सर्वांनाच मोबाईल, त्यावर हाताळण्यात येणाऱ्या व्हॉट्स अँप, फेसबूक, इंस्टाग्राम, ट्विटर आदी समाज माध्यमांनी भुरळ घातलेली आहे. यू ट्यूब, रिल्स आणि विविध अँप तर कमाईचे साधन बनलेले आहेत. कोरोनाकाळात स्मार्ट फोनवर फक्त बोटावर मोजण्या इतके साहित्य आणि शैक्षणिक समूह होते. त्यातून विविध गोष्टी शिकायला मिळत होत्या. साहित्यिकांचे साहित्य वाचकांपर्यंत पोहोचत होते. मात्र सध्या व्हॉट्स अँपवर विविध राजकीय पक्षांच्या, विविध जाती धर्माच्या तसेच विविध मित्र मैत्रिणींच्या घोळक्यांच्या समूहासह साहित्य समूहांचा जणू पूरच आल्यासारखे चित्र दिसते आहे. महिन्यागणिक एक नवा साहित्य समूह उदयास येतो आणि कुठल्यातरी एखाद्या ओळखीच्या समूहातील साहित्यिकांना नव्याने समाविष्ट करतो.

तेच समूह, तेच लोकं आणि त्याच पोस्ट. काही समूहाची नियमावली असते तर काही नुसतेच स्वैर असल्यासारखे चित्र असल्याने जे कामाचे तेच हातून निसटून जाते आणि समूहात उरते ती फक्त निव्वळ बाष्कळ चर्चा.

वाढदिवस, श्रद्धांजली, अभिनंदन, गुड मॉर्निंग, वधू वर मेळावे, पंचांग या सर्वांच्या पोस्टमुळे मोबाईलची मेमोरी भरायला येते. बरे यात स्वलिखित असेल तर किमान कुणी वाचतील तरी. पण, अनेकदा वरील काही पोस्ट आयत्या बनवून डाउनलोड केलेल्या असतात. काहींना तर कुठल्या थोर महात्म्यांची पुण्यतिथी जयंती सुद्धा माहित नसते. तारीख निघून गेलेली असते तरीही दुसऱ्या तिसऱ्या दिवशी त्यांना अभिवादन करणाऱ्या पोस्ट समूहात झळकायला लागतात आणि रसिक माणसाला पश्चाताप केल्यावाचून किंवा समूहातून निघून जाण्यावाचून पर्याय नसतो. कुठलेही तंत्रज्ञान मर्यादेच्या आत वापरले तर मानवी हिताचे असते. मात्र, त्याचा अतिरेक झाला की तेच मानवावर उलटते हे ज्ञात असूनही माणूस त्यात गुंतला जातोय, ही फार वैचारिक बाब आहे.

मनोरंजन म्हणून याकडे बघितले तरी सतत मोबाईलच्या संपर्कात असल्याने दृष्टीदोष आणि मेंदूचे इतर विकार उद्भवायला लागतात, असे खुद्द तज्ज्ञ सांगतात. तरी सुद्धा निरर्थक असलेल्या पोस्ट समूहात येतात आणि जे खरेच लिहिते साहित्यिक आहेत, ते अशा पोस्टना बळी पडतात. दिवसभरातून कितीतरी निरर्थक पोस्ट, फोटो डिलिट करता करता नाकी नऊ येऊन जातात आणि त्यातच वेळही जातो शिवाय डाटासुद्धा संपतो तो वेगळाच. सेटिंग करून ठेवली तरी तेच हाल.

साहित्य समूहांचे म्हणायचे झाल्यास हल्ली कित्येक साहित्य समूहांत एखादा दैनिक विषय दिला जातो. त्यावर कुठल्यातरी किंवा आवडत्या विषयावर लिहा म्हणून सांगितले जाते. आपल्या समूहात लोकांनी लिहावे म्हणून आकर्षक सन्मानपत्रांचे आमिष सुद्धा दाखविले जाते. मात्र, नोंदणीकृत समूहाचे सन्मानपत्र वगळल्यास इतर सन्मानपत्र कुठल्याच कामाचे नसते, ही बाब अनेकांना माहितच नसावी. आता काही समूह खरेच साहित्य सेवा म्हणून कार्यरत आहेत. त्यात साहित्याला न्याय सुद्धा मिळतो. काही नियमावली सुद्धा आखून दिलेली असते आणि विशेष म्हणजे कुणाचे लिखाण कुठे चुकले याबद्दल मार्गदर्शन सुद्धा केले जाते आणि उत्तम साहित्याला अभिप्राय सुद्धा दिल्या जाते. त्यातून साहित्यिकांची जडण घडण होऊ लागते. त्यांचे कौतुक करावे लागते. मात्र, साहित्य समूहांच्या या भाऊगर्दीत असेही काही समूह आहेत की, त्यांनी दैनिक लिखाणासाठी एखादी पोस्ट टाकतो म्हटले तरी त्यात त्यांची नियमावली, तारीख आणि वार आणि वेळ एक नव्हे दोन तीनदा टाकलेला असतो. समूहाचे नाव दोन चार वेळा पोस्टमध्ये असते. मग, प्रशासक, आयोजक, निरीक्षक, दैनिक विषय सुचविणारे उपक्रम प्रमुख, काव्य प्रकार, संकलन करणारे, दैनिक विषय, संचालक मंडळ, विशेष सल्लागार, संस्थापक, अध्यक्ष, सचिव, कार्याध्यक्ष, समीक्षक, ग्राफिक्स, उपक्रम क्रमांक, समूहाची स्थापना दिनांक, मार्गदर्शक, परीक्षक, समूहाची लिंक, मग त्यात विविध ईमोजी असे हे पायलीचे पन्नास नावं असतात. त्यामुळे काहींना मोबाईलची मेमोरी रोज डिलीट करावी लागते.

बरे इतकी नावे नाही लिहिली तर समूहातील कार्यकारिणी नाराज होते असे काहीकांचे म्हणणे असते. मग, नावासाठी रुसणाऱ्या या कार्यकारणीमधील किती लोकं रोजच्या साहित्याला दाद देतात? जवळपास सहा सात वर्षे झालीत. आम्ही ऑनलाईन साहित्य समूहांत लिखाण करतो आहोत. काही निवडक सोडले तर अशा लांबलचक कार्यकारणीमधील कित्येकांनी एक शब्द सुद्धा अभिप्राय म्हणून लिहिलेला नसतो. बाकीचे तर सोडा! खुद्द संस्थापक असणाऱ्यांनी सुद्धा कधीही अभिप्राय दिल्याचे दिसून येत नाही. समूहात ढुंकून सुद्धा बघितलेले नसते.

मग, समूह बनवायचा कशाला? साहित्य सेवा म्हणून आपण समूह बनवत असाल तर त्यातील नवोदितांना किंवा चुकलेल्या साहित्याला मार्गदर्शन करा ना! की, नुसतीच साहित्याची दुकानदारी उभी करून आम्ही साहित्य सेवक आहोत म्हणून मिरवायचे आणि नावलौकिक मिळवायचा याला काय अर्थ उरतो? काही समूहाचे संस्थापक आपल्या समूहातील लोकांचे साहित्य अखिल भारतीय साहित्य संमेलनात पोहचले पाहिजे म्हणून इतरांचे साहित्य गौण समजल्या सारखे सुद्धा करतात. त्यामुळे एखाद्या उत्कृष्ट साहित्यिकावर अन्याय होऊ शकतो, याचे सुद्धा भान त्यांना नसते. सांगायचे एवढेच की, साहित्य समूह बनविला तर त्यात साहित्याबद्दलच चर्चा व्हायला हवी. नव्या शब्दांचा शोध आणि विस्मरणात गेलेल्या शब्दांची उजळणी व्हायला हवी. कुणी कुणाच्या गजलेला किंवा कवितेला सूर लावून बघावा. कुणी समीक्षण करायला पाहिजे तर कुणी कुणाची कथा कथन करायला हवी. गावबोली जतन केल्या जाईल असे उपक्रम घ्यायला हवेत. न की कुठल्या राजकीय पोस्ट, धर्म द्वेषीय पोस्ट टाकल्या जाव्या. दैनंदिन विषय सराव करण्यासाठी योग्य आहे. मात्र, त्यातील नामावली इतकी लांबलचक आणि किचकट नको की, ती लिहित्या हातांना रोज डिलीट मारावी लागत असावी.

अन्यथा हेच म्हणावे लागेल...

उदंड झाले साहित्य समूह,<br>
साहित्य त्यातले कळेना<br>
लिहिणे म्हणून लिहिणे आहे,<br>
साहित्यिक त्यातून घडेना

- ८४१२८७७२२०

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवाचे भवितव्य: विकासाकडून विनाशाकडे जाणारा मार्ग?

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

भविष्यातील युद्धाची कल्पना आपण नेहमी कल्पित विज्ञानकथांमध्येच पाहिली आहे, जिथे भावनाशून्य यंत्रे माणसांविरुद्ध लढत आहेत आणि पृथ्वीवर विनाश करत आहेत. पण आता ही कल्पना फक्त पडद्यावर मर्यादित राहिलेली नाही, तर ती प्रत्यक्ष वास्तवात उतरत असल्याची भीती निर्माण झाली आहे. जगात कुठेतरी स्वायत्त आणि आत्मघातकी रोबोट्सचा वापर करून एकाच वेळी ३००० सैनिकांना ठार मारण्यात आले आहे, अशा बातम्यांनी सध्या जगभरात मोठी खळबळ उडवून दिली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रगत रोबोटिक्सच्या या युगात मानवाचे अस्तित्व खरंच धोक्यात आहे का, हा अत्यंत गंभीर आणि अस्वस्थ करणारा प्रश्न या निमित्ताने ऐरणीवर आला आहे. एकत्रित हजारो सैनिकांना आत्मघातकी रोबोट्सनी मारल्याचा दावा सध्याच्या घडीला जरी अधिकृतपणे सिद्ध झालेला नसला किंवा काहीसा अतिशयोक्तीपूर्ण वाटत असला, तरी तो भविष्यातील एका भयानक वास्तवाची पूर्वकल्पना नक्कीच देतो.

रशिया-युक्रेन किंवा इस्त्रायल-हमास यांसारख्या सध्याच्या संघर्षांमध्ये कामिकाझे ड्रोन्स आणि मानवी हस्तक्षेपाविना चालणाऱ्या घातक स्वायत्त शस्त्रास्त्रांचा वाढता वापर हेच दर्शवतो की आपण एका अत्यंत धोकादायक वळणावर उभे आहोत.

या सर्व चर्चेच्या केंद्रस्थानी आहेत घातक स्वायत्त शस्त्रप्रणाली, ज्यांना सामान्य भाषेत किलर रोबोट्स म्हटले जाते. ही अशी शस्त्रे आहेत जी मानवी हस्तक्षेपाशिवाय स्वतःचे निर्णय घेऊन शत्रूची ओळख पटवतात आणि हल्ला करतात. या यंत्रांमध्ये दया, सहानुभूती किंवा नैतिक निर्णय घेण्याची क्षमता अजिबात नसते. युद्धाच्या अत्यंत नाजूक आणि गुंतागुंतीच्या परिस्थितीत निष्पाप नागरिक आणि प्रत्यक्ष शत्रू यातील फरक ओळखण्यात ही यंत्रे अपयशी ठरू शकतात. यात जर काही तांत्रिक बिघाड झाला किंवा अल्गोरिदम चुकीचे काम करू लागले, तर एका चुकीच्या कमांडमुळे महाभयंकर विध्वंस होऊ शकतो. अशावेळी या यंत्रांना थांबवणे मानवाच्या हाताबाहेर जाऊ शकते. जगातील महासत्ता देश कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित लष्करी तंत्रज्ञानात एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी जी जीवघेणी शर्यत करत आहेत, ती भविष्यात जागतिक शांततेला सर्वात मोठा धोका निर्माण करणार आहे.

तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज आणि या तंत्रज्ञानाचा पाया रचणाऱ्या अनेक महान विचारवंतांनीही या धोक्याची तीव्रता ओळखली आहे. एलॉन मस्क यांनी वारंवार जगाला सावध केले आहे की हे तंत्रज्ञान अण्वस्त्रांपेक्षाही जास्त भयंकर असू शकते आणि त्यावर नियंत्रण न ठेवल्यास मानवी सभ्यतेचा अंत होऊ शकतो. दिवंगत महान भौतिकशास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांनीही स्पष्टपणे सांगितले होते की परिपूर्ण कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास हा मानवजातीचा शेवट ठरू शकतो, कारण यंत्रे स्वतःचा विकास प्रचंड वेगाने करतील आणि मानव त्यांच्या खूप मागे पडेल.

कृत्रिम बुद्धिमत्तेचे जनक मानले जाणारे जिओफ्री हिंटन, सॅम ऑल्टमन, बिल गेट्स आणि मार्क झुकरबर्ग यांसारख्या दिग्गजांनीही या तंत्रज्ञानाच्या अमर्याद वेगाबद्दल आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या डीपफेक, सायबर हल्ले, माहितीचे युद्ध आणि रोजगाराच्या संकटाबद्दल अत्यंत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. जेव्हा यंत्रांची विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता मानवाच्या बुद्धिमत्तेला मागे टाकेल, तेव्हा ते मानवाचे आदेश मानतीलच याची कोणतीही शाश्वती नाही.

या वाढत्या धोक्याची जाणीव ठेवून आता संयुक्त राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय समुदायाने अत्यंत कठोर पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे. अण्वस्त्रांवर नियंत्रण ठेवणाऱ्या आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेसारख्याच एका शक्तिशाली, स्वतंत्र आणि जागतिक आंतरराष्ट्रीय नियंत्रण संस्थेची स्थापना आता कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी करणे ही काळाची अत्यंत तातडीची गरज बनली आहे. या जागतिक नियंत्रण संस्थेकडे केवळ सल्ला देण्याचे नव्हे, तर कठोर कारवाई करण्याचे अधिकार असले पाहिजेत.

जगातील कोणत्याही कंपनीने किंवा देशाने नवीन प्रगत प्रणाली बनवण्यापूर्वी त्याचे या जागतिक संस्थेकडून परीक्षण होणे अनिवार्य असावे. या अल्गोरिदममध्ये मानवी नीतिमत्तेला बाधा आणणारा किंवा विनाशाला निमंत्रण देणारा कोणताही घटक नाही, याची खात्री झाल्याशिवाय नवीन तंत्रज्ञान बाजारात आणण्यास सक्त मनाई असली पाहिजे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून पूर्णपणे स्वयंचलित शस्त्रे बनवण्यावर या संस्थेच्या माध्यमातून जागतिक बंदी आणली जावी, कारण मृत्यूचा निर्णय घेण्याचा अधिकार कोणत्याही भावनाशून्य यंत्राला देता कामा नये.

एकाच वेळी हजारो सैनिकांना मारल्याची घटना सध्यातरी अतिशयोक्ती वाटत असली, तरी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आत्मघातकी ड्रोनचा प्रत्यक्ष युद्धभूमीवरील वापर ही आता भविष्यातील कविकल्पना राहिलेली नाही. मानवी हस्तक्षेपाविना किंवा अत्यंत कमी मानवी नियंत्रणाने चालणाऱ्या स्वायत्त शस्त्रास्त्रांचा विनाशकारी वापर जगातील अनेक युद्धक्षेत्रांवर आधीच सुरू झाला आहे. या भयानक वास्तवाची पहिली अधिकृत नोंद २०२० मध्ये लिबियाच्या गृहयुद्धात झाली, जिथे एका स्वायत्त ड्रोनने माघार घेणाऱ्या बंडखोर सैनिकांचा मानवी नियंत्रणाशिवाय पाठलाग करून त्यांच्यावर आत्मघातकी हल्ला केला.

या पाठोपाठ अझरबैजान आणि आर्मेनिया यांच्यातील संघर्षामध्ये आत्मघातकी ड्रोनने शत्रूचे रडार स्वतःहून शोधून अचूक वेध घेत पारंपारिक युद्धाचे नियमच बदलून टाकले. सध्या सुरू असलेल्या रशिया-युक्रेन युद्धात तर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अभूतपूर्व पातळीवर पोहोचला असून, मानवी संपर्क तुटल्यानंतरही स्वतःहून लक्ष्याचा वेध घेणारे आणि हवेत घिरट्या घालणारे स्वयंचलित बॉम्ब दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर वापरले जात आहेत. तसेच, इस्त्रायल-हमास संघर्षामध्ये लष्कराने केवळ ड्रोन उडवण्यासाठीच नाही, तर कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणालींचा वापर करून हजारो संशयित लक्ष्यांची यादी अत्यंत वेगाने तयार करण्याचे काम केले आहे. थोडक्यात सांगायचे तर, विज्ञानकथांमधील मानवी आकाराचे यंत्रमानव अजून युद्धात उतरलेले नसले तरी, आकाशातून घिरट्या घालत आपल्या प्रणालीवर स्वतःच मृत्यूचा निर्णय घेणारे आत्मघातकी ड्रोन आजच्या घडीला जगभरात प्रत्यक्ष विनाशाचे काम करत आहेत, हेच या घटनांवरून स्पष्ट होते.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्स हे मुळात वाईट तंत्रज्ञान नाही. वैद्यकीय क्षेत्रात अचूक शस्त्रक्रिया करणे, दुर्धर आजारांवर उपचार शोधणे, हवामान बदलाचा सामना करणे आणि आपत्ती व्यवस्थापन अशा अनेक विधायक कामांसाठी या तंत्रज्ञानाचा अत्यंत प्रभावी वापर होऊ शकतो. प्रश्न तंत्रज्ञानाचा नसून मानवाच्या हेतूचा आहे. तंत्रज्ञान हे दुधारी तलवारीसारखे असते.

जर आपण आज यावर जागतिक लगाम घातला नाही, तर हीच तलवार मानवाचा गळा कापल्याशिवाय राहणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवाची महान निर्मिती नक्कीच आहे, पण ती मानवाची सेवक म्हणूनच राहिली पाहिजे, भस्मासूर नाही. मानवाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी या अफाट शक्तीचा वापर केवळ विकासासाठीच होईल, विनाशासाठी नाही, हे सुनिश्चित करण्याची जबाबदारी आता संपूर्ण जगावर आहे.

- ९५६१५९४३०६

# माहिती अधिकाराचे उद्देश आणि महत्त्व

**कृष्णकुमार निकोडे**
**गडचिरोली**

माहितीच्या सार्वत्रिक वापरासाठी आंतरराष्ट्रीय दिवस दरवर्षी २८ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. याचा उद्देश प्रत्येक व्यक्तीला माहिती मिळवण्याचा हक्क आणि त्याच्या महत्वावर जागरूकता वाढवणे आहे. या दिवसाचा प्रारंभ युनेस्कोने २०१५ मध्ये केला, ज्यामुळे लोकांना सरकारी आणि सार्वजनिक माहिती मिळवण्याचे अधिकार सुनिश्चित केले जातात. माहिती मिळवण्याचा हक्क हा लोकशाहीचा एक महत्त्वाचा घटक आहे, कारण तो नागरिकांना त्यांच्या सरकारांशी संवाद साधण्याची आणि जबाबदारी विचारण्याची संधी देतो.

या दिवसाचे महत्त्व- विशेषतः विकसनशील देशांमध्ये आणि वंचित समुदायांमध्ये अधिक असते, कारण माहितीचा प्रवेश सामाजिक विकास, सुशासन, आणि पारदर्शकतेला चालना देतो. डिजिटल युगात, माहितीचा प्रवेश केवळ छापील माध्यमांपुरता मर्यादित नसून, इंटरनेटच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे, सर्वांना माहितीचा प्रवेश देणे म्हणजे समानता, न्याय, आणि शाश्वत विकासाला चालना देणे होय. माहितीचा सार्वत्रिक वापर म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही भेदभावाशिवाय माहिती मिळवण्याचा, तिचा वापर करण्याचा आणि ती सामायिक करण्याचा अधिकार असणे. लोकशाही बळकट करण्यासाठी, सरकारी कामात पारदर्शकता आणण्यासाठी आणि नागरिकांना सक्षम करण्यासाठी माहितीची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या संकल्पनेशी संबंधित महत्त्वाचे मुद्दे: माहितीच्या सार्वत्रिक वापराचा आंतरराष्ट्रीय दिवस - दरवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस जगभरात "माहितीच्या सार्वत्रिक वापराचा आंतरराष्ट्रीय दिवस" म्हणून साजरा केला जातो. सुरुवातः सन २०१५ मध्ये युनेस्कोने या दिवसाची घोषणा केली आणि सन २०१९ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने याला मान्यता दिली. उद्देशः नागरिकांना त्यांचे हक्क मिळवून देणे, निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढवणे आणि सरकारी कामात पारदर्शकता आणणे.

भारताच्या संदर्भातः माहितीचा अधिकार कायदा- RTI Act, २००५ भारतात माहितीचा सार्वत्रिक वापर प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी माहितीचा अधिकार कायदा, २००५ लागू करण्यात आला. या कायद्यांतर्गत कोणताही भारतीय नागरिक कोणत्याही सरकारी कार्यालयातून, ग्रामपंचायतीमधून किंवा सार्वजनिक संस्थेकडून कामाचा तपशील, खर्चाचा हिशोब आणि इतर सार्वजनिक माहिती मागवू शकतो. सामान्यतः अर्ज केल्यापासून ३० दिवसांच्या आत माहिती मिळणे बंधनकारक असते.

माहितीच्या सार्वत्रिक वापराचे महत्त्व- भ्रष्टाचाराला आळाः सरकारी निधी आणि योजनांचा वापर कुठे आणि कसा होतोय हे समजल्यामुळे भ्रष्टाचाराला चाप लागतो.

डिजिटल समावेशकताः इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांमुळे आता दुर्गम भागातील नागरिकांनाही हवी ती माहिती सहज उपलब्ध होत आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्यः माहिती मिळाल्यामुळे नागरिक अधिक चांगल्या प्रकारे आपले मत मांडू शकतात आणि योग्य नेत्यांची निवड करू शकतात.

केंद्रीय कायदा : भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १९ (१- क) मध्ये भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे म्हणूनच माहितीचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे मत सर्वोच्च व उच्च न्यायालय यांनी भारतातील विविध न्यायनिवाड्यात व्यक्त केले आहे. भारतात केंद्रीय माहिती अधिकार कायद्याला १५ जून २००५ रोजी राष्ट्रपतींची मान्यता मिळाली व कायद्यातील काही तरतुदी अंशतः लागू करण्यात आल्या. तर १२ ऑक्टोबर २००५ पासून या कायद्याची अंमलबजावणी जम्मू काश्मीर राज्य वगळता संपूर्ण भारतात सुरु झाली. त्यानिमित्त ६ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत माहिती अधिकार सप्ताह साजरा करण्यात येतो.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार : केंद्रीय कायदा येण्यापूर्वीच ९ राज्यांनी माहितीचा अधिकार कायदा तसेच ३ राज्यांनी त्यासंबंधीचे विधेयके, कोड बनवण्यास सुरुवात केली होती. राजस्थानातील सामाजिक लेखापरिक्षणाच्या यशस्वी चळवळीपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रामध्ये माहितीचा अधिकार कायदा-२००२ संमत करण्यात आला. या कायद्यासंदर्भात देश व आंरराष्ट्रीय पातळीवर बदलत चालेले वातावरण तसेच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आंदोलनाच्या माध्यमातून धरलेल्या आग्रहाखातर महाराष्ट्र शासनाने तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार २००२ मध्ये कायद्यात सुधारणा करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. माहिती अधिकार काही राज्यात पूर्वीपासून अंमलात होता. तथापि, माहिती अधिकाराचा कायदा पारित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

माहिती अधिकाराचा उद्देश : नागरिकांना आवश्यक असलेली माहिती पुरविणे, प्रशासनात शिस्त निर्माण करुन अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीत व कार्यक्षमतेत वाढ करणे, शासन यंत्रणेतील व्यवहारात पारदर्शकता आणने, भ्रष्टाचाराचे समूळ निर्मूलन व्हावे, प्रशासकीय कार्यपध्दती, नियम व इतर शासकीय कामांमध्ये गैरव्यवहारात वाव राहू नये, शासकीय कार्यपध्दतीबद्दल सामान्य जनतेला सांशकता वाटू नये व त्यांची कामे विनाविलंब, सहजगत्या व्हावीत यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याची निर्मिती झाली.

- ९४२३७१४८८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# दीक्षाभूमीच्या सर्वांगीण विकासासाठी ५२ एकर जमीन द्या!

## १४ ऑक्टोबरपर्यंत निर्णयाची मागणी; निर्णय न झाल्यास १५ ऑक्टोबरपासून बेमुदत आंदोलनाचा मिशन बहुजनचा इशारा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दीक्षाभूमीच्या वाढत्या गरजा आणि दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त येथे येणाऱ्या लाखो अनुयायांची संख्या लक्षात घेता, मौजा लेंड्रा - काचिपुरा येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ताब्यातील सुमारे ५२ एकर जमीन दीक्षाभूमीच्या सर्वांगीण व नियोजनबद्ध विकासासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी मिशन बहुजनच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीसंदर्भात मिशन बहुजनचे अध्यक्ष राकेश धारगावे यांच्या स्वाक्षरीचे अंतिम निवेदन बुधवारी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, नागपूरचे जिल्हाधिकारी तसेच नागपूर विभागाचे विभागीय आयुक्तांना सादर करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षाभूमी येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यामुळे दीक्षाभूमीला ऐतिहासिक, सामाजिक आणि धम्माच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशभरातून मोठ्या संख्येने अनुयायी नागपुरात दाखल होतात.

यामुळे पार्किंग, वाहतूक, निवास, स्वच्छता, आरोग्य, सुरक्षा तसेच इतर मूलभूत सुविधांवर मोठा ताण निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर दीक्षाभूमीचा भविष्यातील



वाढता विस्तार आणि अनुयायांच्या सुविधांचा विचार करून अतिरिक्त जमीन उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे मिशन बहुजनने निवेदनात नमूद केले आहे.

**५२ एकर जमिनीवर नियोजनबद्ध विकासाची मागणी**

मिशन बहुजनने काचिपुरा, मौजा लेंड्रा येथील सुमारे ५२ एकर जमीन दीक्षाभूमीच्या विकासासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. या जागेचा उपयोग केवळ तात्पुरत्या व्यवस्थेसाठी न करता दीर्घकालीन विकास आराखड्या नुसार करण्यात यावा, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे. या विकास आराखड्यात पार्किंग व्यवस्था, अनुयायांसाठी निवास सुविधा, स्वच्छता व्यवस्था, आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था, वाहतूक व्यवस्थापन तसेच सांस्कृतिक आणि सामाजिक सुविधांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

१४ ऑक्टोबरपर्यंत लेखी निर्णयाची मागणी मिशन बहुजनने शासनाला १४ ऑक्टोबर २०२६, अर्थात धम्मचक्र प्रवर्तन दिनापर्यंत या मागणीवर स्पष्ट व लेखी निर्णय अथवा ठोस लेखी आश्वासन देण्याची मुदत दिली आहे. शासनाकडून या कालावधीत निर्णय किंवा लेखी आश्वासन न मिळाल्यास १५ ऑक्टोबर २०२६ पासून दीक्षाभूमी परिसर अथवा जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे बेमुदत साखळी उपोषण व आमरण उपोषणाचे आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. हे आंदोलन लोकशाही व शांततामय मार्गाने करण्यात येणार असल्याचेही मिशन बहुजनने स्पष्ट केले आहे. दीक्षाभूमीचे ऐतिहासिक महत्त्व, येथे दरवर्षी येणाऱ्या लाखो अनुयायांची संख्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन शासनाने ५२ एकर जमिनीच्या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, असे आवाहन मिशन बहुजनचे अध्यक्ष राकेश धारगावे यांनी केले आहे.

# मौदा येथील अतिगर्दीच्या चौकात गतिरोधक बसवण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

मौदा-भंडारा रोडवरील 'शिओम बार अँड रेस्टॉरंट' समोरील चौक सध्या अपघातांचे मुख्य केंद्र बनला आहे. या ठिकाणी लहान शालेय मुले, नागरिक आणि वाहनांची प्रचंड गर्दी असते. मात्र, प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे येथे दररोज लहान-मोठे अपघात घडत असून, नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपंचायतीला थेट इशारा दिला आहे.

या चौकाच्या आजूबाजूला महत्त्वाची शाळा, नगरपंचायत कार्यालय आणि देशी दारूचे दुकान आहे. त्यामुळे येथे सकाळपासूनच विद्यार्थी



आणि नागरिकांची मोठी वर्दळ असते. सकाळी मुले शाळेत जात असतानाच, या मार्गावरून धावणाऱ्या बस आणि टिप्परचा वेग अत्यंत जास्त असतो. या सुसाट वाहनांमुळे रस्ता ओलांडताना शालेय विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या संवेदनशील विषयाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे नागरिकांना रोज भीतीच्या सावटाखाली रस्ता ओलांडवा लागत आहे.

**७ दिवसांत कारवाई न झाल्यास प्रशासनाला धारेवर धरणार!**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि जनहितार्थ नागरिकांनी प्रशासनाला ७ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. या मुदतीत खालील मागण्या पूर्ण करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. चौकात तातडीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसवण्यात यावे. रस्ता ओलांडण्यासाठी झेब्रा क्रॉसिंग आणि पांढरे पट्टे मारण्यात यावेत. वाहनचालकांना सावध करण्यासाठी 'शाळा व गर्दी क्षेत्र' दर्शवणारा फलक लावण्यात यावा.

"जर दिलेल्या मुदतीत येथे गतिरोधक आणि आवश्यक उपाययोजना केल्या नाहीत, आणि भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडली, तर त्याला सर्वस्वी संबंधित कार्यालय आणि अधिकारीच जबाबदार राहतील," असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे. आता तरी प्रशासन जागे होऊन अपघात रोखण्यासाठी पावले उचलणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मेंढला गावावर 'तिसऱ्या डोळ्या'ची नजर; सुरक्षेला ग्रामपंचायतीचे कवच

## सरपंच नंदू चरपे यांच्या पुढाकाराने सीसीटीव्ही कॅमेरे अन् चौकाचौकात हायमास्ट, जलालखेडा पोलिसांच्या सूचनेची प्रभावी अंमलबजावणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील मेंढला गावातील नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत ग्रामपंचायतीने आधुनिक सुरक्षाव्यवस्थेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सरपंच नंदू चरपे यांच्या पुढाकाराने गावातील प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून चौकाचौकात हायमास्ट लाईटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जलालखेडा पोलीस स्टेशनच्या सूचनेनुसार सुरक्षेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या या उपाययोजनांमुळे मेंढला गाव आता सीसीटीव्हीच्या तिसऱ्या डोळ्याच्या निगराणीखाली आले आहे.

गावातील प्रमुख चौक, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे तसेच नागरिकांची मोठी वर्दळ असलेल्या परिसरावर सीसीटीव्हीच्या माध्यमातून लक्ष ठेवणे शक्य होणार आहे. चोरी, संशयास्पद हालचाली, भांडणे, सार्वजनिक ठिकाणी होणारे गैरप्रकार तसेच इतर अनुचित घटना रोखण्यासाठी या यंत्रणेची मदत होणार आहे. एखादी घटना



संग्रहित

घडल्यास सीसीटीव्ही फुटेज तपासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून पोलिसांना तपासातही त्याचा उपयोग होण्याची शक्यता आहे. जलालखेडा पोलीस स्टेशनकडून गावातील सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी करण्यात आलेल्या सूचनेची ग्रामपंचायतीने दखल घेतली. पोलिस प्रशासन आणि ग्रामपंचायतीच्या समन्वयातून गावातील सार्वजनिक सुरक्षेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाली आहे.

दरम्यान, गावातील विविध चौकांमध्ये हायमास्ट लाईट उभारण्यात आल्याने रात्रीच्या वेळी अंधाराची समस्या कमी झाली आहे. प्रमुख रस्ते आणि चौक प्रकाशाने उजळून निघाल्याने नागरिकांची रात्रीची ये-जा अधिक सुरक्षित व सुलभ होणार आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच रात्रीच्या वेळी कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या नागरिकांना या प्रकाशव्यवस्थेचा मोठा फायदा होणार आहे.

ग्रामपंचायतीच्या विकास कामांमध्ये केवळ रस्ते, नाल्या आणि मूलभूत सुविधांपुरते मर्यादित न राहता नागरिकांची सुरक्षितता आणि आधुनिक सुविधांनाही प्राधान्य देण्यात येत आहे. सीसीटीव्ही आणि हायमास्ट लाईटमुळे गावातील सुरक्षाव्यवस्था मजबूत होण्याबरोबरच रात्रीच्या वेळी गावाच्या सौंदर्यातही भर पडली आहे. भविष्यात गरजेनुसार आणखी महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, गावाच्या प्रवेशमार्गांवर निगराणी वाढविणे तसेच हायमास्ट व इतर पथदिव्यांची नियमित देखभाल करण्याची गरज आहे. या सुविधांचा योग्य वापर आणि नियमित देखभाल झाल्यास मेंढला गावातील सुरक्षाव्यवस्था आणखी प्रभावी होण्यास मदत होणार आहे.

ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत होत असून विकासकामांसोबत सुरक्षेलाही प्राधान्य दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी तसेच परिसरात संशयास्पद हालचाल आढळल्यास तातडीने ग्रामपंचायत किंवा पोलिसांना माहिती देण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

गावाचा विकास म्हणजे केवळ भौतिक सुविधा उभारणे नव्हे, तर नागरिकांना सुरक्षित आणि निर्भय वातावरण देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जलालखेडा पोलीस स्टेशनच्या सूचनेनुसार सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या असून मेंढला गाव अधिक सुरक्षित, प्रकाशमय आणि सुविधायुक्त करण्यासाठी यापुढेही आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे सरपंच नंदू चरपे यांनी सांगितले.

# मौदा आयातदार संघटनेची स्थापना उमेद अभियान

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

२८ सप्टेंबर रोजी मौदा तालुक्यात, कोडामेंधी येथे झालेल्या एआयटीयूसीच्या बैठकीत कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आली. १०० हून अधिक महिलांच्या उपस्थितीत एकमताने निर्णय घेण्यात आला आणि कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली. इंदूर येथील आयसीआरपीच्या मीनाक्षी सुनील दहाके यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. सचिव निशा सुनील वैद्य क्ष्ऊफ्ढ बाबादेव यांची निवड झाली. सीटीसीच्या काजल सुभाष वानखेडे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली.

क्ष्ऊफ्ढ च्या निकिता शरद लोहबारे यांची खजिनदार म्हणून निवड झाली. सहसचिव सुजाता काडू यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली आहे.

सर्व महिलांची एकजूट पाहून, नामनिर्देशित अध्यक्ष दहाके म्हणाल्या की, माझ्या भगिनींनी माझ्यावर सोपवलेली जबाबदारी मी पूर्ण जबाबदारीने पार पाडण्याचा प्रयत्न करेन आणि एआयटीयूसी संघटनेच्या झेंड्याखाली मोर्चा आंदोलनाच्या माध्यमातून सरकार व प्रशासनासोबत मिळून महिलांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेन. कारण ज्या संघटनेचा झेंडा घेऊन आम्ही या क्षेत्रात उतरलो आहोत, ती संघटना असंघटित क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी १०० वर्षांहून अधिक काळ कार्यरत आहे आणि सध्याची परिस्थिती पाहता, आमच्याकडे 'करा किंवा मरा' याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरलेला नाही.

त्याच क्रमाने, सचिव निशा वैद्य म्हणाल्या की, आता परिस्थिती हाताबाहेर गेली आहे आणि आता आपल्याला 'करा किंवा मरा' अशी लढाई लढावी लागेल. 'आता नाही तर कधीच नाही' असे म्हणत त्या म्हणाल्या की, आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून सरकारच्या 'उम्मीद अभियाना'त काम करत आहोत. आम्ही



गावातील महिलांना सरकारी योजनांद्वारे उपजीविका देऊन आणि त्यांना आत्मनिर्भर बनवून 'लखपती दीदी' बनवण्यासाठी काम करतो. आणि आम्ही स्वतः 'भिकारी दीदी' आहोत कारण आमचे मानधन फक्त ३००० रुपये आहे. त्यामुळे आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे खूप कठीण होते.

आता आमची मागणी आहे की, सरकारच्या किमान मानधनानुसार ते २१००० रुपये असावे. आम्ही आघाडी आंदोलने आणि तीव्र निदर्शने आयोजित करून यासाठी लढू. आज जेव्हा राज्य आणि केंद्र सरकार महिला सक्षमीकरणाबद्दल बोलतात, तेव्हा आमच्या बाबतीत हा अन्यायकारक दृष्टिकोन का, जेव्हा आम्ही सर्व कार्यकर्ते २४७ काम करतो. आम्ही गावातील सर्व माहिती गोळा करून सरकारी पोर्टलवर अपलोड करतो, ज्याद्वारे सरकारला ग्रामीण भागांविषयीची सर्व माहिती उपलब्ध होते आणि आम्ही सांगितले की आम्ही स्वतंत्र आहोत व एका स्वतंत्र संघटनेसोबत लढून आमच्या मागण्या पूर्ण करून घेऊ.

उपाध्यक्ष काजल वानखेडे यांनी माहिती दिली की, गेल्या एका महिन्यापासून संपूर्ण राज्यात कामबंद आंदोलन सुरू असून, या लढ्याचे आवाहन ०३/१०/२०२६ रोजी नागपूर येथून केले जाईल. हजारो लोकांचा हा भव्य मोर्चा नेहरू पार्क ते संविधान चौक, असे ५ किलोमीटर अंतराचे असेल. कार्यकारी समितीच्या इतर सदस्यांनी महिलांचे आभार मानले आणि 'एकातून अनेक' होण्याच्या प्रक्रियेत सहभागी झाल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

तालुक्यातील वरिष्ठ कार्यकर्त्यांनीही नवनियुक्त कार्यकारिणीचे अभिनंदन केले आणि सांगितले की, मौदा तालुक्याच्या सिंहीणींची गर्जना केवळ जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात ऐकू येईल आणि बंडाचे हे रणशिंग वाजले असून ते उर्वरित तालुके आणि जिल्ह्यांमध्ये प्रेरणेची ठिणगी म्हणून काम करेल.

यावेळी स्वाती डोरले, किरण बावणे, पोर्णिमा सावलाखे, भारती तांडेकर, मंगला वासनिक, प्रांजली भुते, अनिता मिरासे, संगीता जगनाडे, जोशिका हटवार, राजकुमारी कचवाह, माधुरी महादुले, भारती चौधरी, प्राजक्ता चौहान, सविता चक्के, एच. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शारदा संजय बिंझाद्रे यांनी केले, आम्ही भारतातील महिला आहोत, आम्ही फुले नसून ठिणग्या आहोत. आवाज उठवा, आम्ही सर्व एक आहोत.

खरे स्वातंत्र्य संघर्षाच्या छायेत वाढते आणि स्त्रियांच्या नेतृत्वाखालीच इतिहासाला कलाटणी मिळते. जिल्हा आणि राज्यभरातील सर्व महिला कार्यकर्त्यांना आवाहन करण्यात आले. आयटक जिंदाबाद, संघर्ष जिंदाबाद, इन्कलाब जिंदाबाद अशा घोषणा देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**थोडक्यात**

## जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आज ज्येष्ठांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भ, नागपूरच्या वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त गुरुवार, १ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता जगनाडे चौक, नंदनवन येथील माता अनुसया सभागृहात सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठांचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, तर विशेष अतिथी म्हणून माजी आमदार सुधाकर कोहळे उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अविनाश तेलंग राहतील.

मान्यवरांच्या हस्ते नारायण समर्थ, मंगला समर्थ, व्रजराज कपाटे, डॉ. पुष्पा तायडे, प्रा. विजया मारोतकर व डॉ रवींद्र बोथरा या ज्येष्ठांचा सत्कार करण्यात येईल. तत्पूर्वी, सकाळी ९.१५ वाजता श्री. नंदकिशोर मुळे व सहकाऱ्यांचा गीतगुंजन हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर होईल. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक मंडळांचे पदाधिकारी, सभासद व नागरिकांसह सर्वांनी वेळेत उपस्थित राहून ज्येष्ठांच्या कार्याचा सन्मान वाढवावा, असे आवाहन अध्यक्ष ॲड. अविनाश तेलंग, कार्याध्यक्ष डॉ. अरविंद शेंडे व सचिव अशोक भुताड यांनी केले आहे.

## कोलकात्यात अ.भा. ग्राहक पंचायतीच्या कार्यकर्त्यांवर हल्ला, विदर्भातून तीव्र संताप आणि निषेध

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या कार्यकर्त्यांवर कोलकाता येथे रविवारी झालेल्या हल्ल्याचा अ.भा. ग्राहक पंचायतीच्या विदर्भ प्रांता तर्फे तीव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात आला आहे. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ग्राहक जागरणाच्या शांतपणे सुरू असलेल्या कार्यक्रमात व्यत्यय आणून एका राष्ट्रवादी ग्राहक चळवळीच्या कार्यकर्त्यांना मारहाण करून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करण्याची ही घटना साम्यवाद्यांच्या भयग्रस्त मानसिकतेचे दर्शन घडविणारी असून या घटनेचा करावा तेवढा निषेध कमीच आहे.

ज्या पश्चिम बंगाल मध्ये साम्यवाद्यांनी अनेक वर्षे राज्य करून, सामान्य ग्राहकांची प्रचंड लूट केली तेथे राष्ट्रवादी शक्तिचे बळकटीकरण होत असल्याने त्यांच्या पोटात गोळा उठणे स्वाभाविक आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायत ही शांतपणे सर्व सामान्य ग्राहकांचे जागरणं करते ही साधी गोष्ट सुद्धा डावे पचवू शकत नाही यावरुन त्यांच्या पायाखालची जमीन सरकली आहे हेच स्पष्ट होते असे मत ग्राहक पंचायतीचे विदर्भ प्रांताध्यक्ष डॉ. नारायण मेहरे,सचिव डॉ चारुदत्त चौधरी, संघटक अभय खेडकर, प.क्षेत्र संघटक नितीन काकडे, सहसचिव विलास ठोसर, आनंद संगई,श्रीपाद भट्टलवार,नवीन दास बैरागी, हितेश सेठ, तुकाराम लुटे, चंद्रकांत पतरंगे, चंद्रशेखर साठे,विरेंद्र चौबे, संतोष डोमाळे, डॉ शोभा गायकवाड, अँड विनिता सावजी, प्रशांत पाचपोहोर इत्यादी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे देशभरातील सर्व कार्यकर्ते कोलकाता येथील ग्राहक पंचायतीच्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून अशा अराजक माजविण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींना विरोध करण्यासाठी ठाम पणे सिद्ध असल्याचे ग्राहक पंचायतीने आपल्या निवेदनात म्हटले आहे.

## गांगणेर येथे १००% अनुदानावर बियाणे देण्यासाठी कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना मागितले मागणी पत्र



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

सोमवार (ता. २८ सप्टेंबर)ला गट ग्रामपंचायत गांगणेर (हिवरा) अंतर्गत येत असलेल्या गांगणेर येथे जिल्हा खनिज प्रतिष्ठान नागपूर अंतर्गत शेतकऱ्यांना मोहरी, चिया सीड, जवस , उन्हाळी मुंग व मक्का बियाणे १००% अनुदानावर देण्यासाठी कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून मागणी पत्र घेतले .तसेच महिला सक्षमीकरण अधिनियम २०२६ नुसार महिला शेतकरी प्रमाणपत्र बाबत सभा घेण्यात आली. महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणी करण्यात आली. याबाबत सरपंच अनिता श्रीधर चिंचूलकर व माजी सरपंच प्रदीप राऊत यांना गावात दवंडी देण्याचे कृषी विभागातील अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. याप्रसंगी कृषी विभागाचे अधिकारी प्रशांत शेंडे (ATM) आत्मा , भिमराव जुमडे कृषीसेवक गांगनेर, प्रदीप राऊत माजी सरपंच तसेच गावातील प्रतिष्ठित मंडळी व शेतकरी उपस्थित होते.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत चाचेर शाळेत वृक्षारोपण



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चाचेर येथे सेवा संकल्प अभियानाअंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. शाळेच्या परिसरात इको क्लबच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून विविध वृक्षांची रोपे लावण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अनिल गडपायले यांनी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणीय महत्त्व, वृक्षसंवर्धनाची गरज तसेच भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवाई जपण्याचे महत्त्व पटवून दिले. वृक्षारोपणानंतर विद्यार्थ्यांनी लावलेल्या रोपांची नियमित काळजी घेऊन त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन सहारे यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षकवृंद रविंद्र घुगे,भारती साखरकर,संगीता बालकोटे, प्रिती खंगार,शिल्पा उकुड्डे,परविन शेख, रुचिला खंडाईत व कु. नेहा निमजे यांनी सहकार्य केले. आजचे रोप म्हणजे उद्याची सावली; वृक्षसंवर्धन हीच काळाची गरज आहे, असा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी दिला.

थोडक्यात

## चोखाळा येथील गोपीचंद पिसे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, काचुरवाही**



रामटेक तालुक्यातील चोखाळा येथील स्थानिक रहिवासी गोपीचंद बाळकृष्ण पिसे (वय ७० वर्षे) यांचे बुधवारी दुपारी २ वाजता आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने चोखाळा परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावर स्थानिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, पाच मुली, एक भाऊ तसेच मोठा आप्तपरिवार आहे. पिसे यांच्या निधनाने कुटुंबीय, नातेवाईक व परिसरातील नागरिकांनी दुःख व्यक्त केले.

## जवाहर विद्यार्थी गृहात २ ऑक्टोबरला भव्य बक्षीस व सत्कार सोहळा

### भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त विविध उपक्रमांतील विजेत्यांचा होणार गौरव




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जवाहर विद्यार्थी गृह, नागपूरच्या वतीने २ ऑक्टोबर रोजी, महात्मा गांधी जयंती व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची माहिती संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र कुमार दिवटे यांच्या नेतृत्वात आयोजित पत्रपरिषदेत देण्यात आली. यावेळी संस्थेचे मुख्यकार्यवाह हर्षवर्धनजी बेले यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. जवाहर विद्यार्थी गृह, नागपूर आणि भारतीय इतिहास प्रबोधिनी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातील विजेत्या व गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य बक्षीस वितरण सोहळा २ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता. जवाहर विद्यार्थी गृह, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमा नंतर दुपारी १२ वाजता. तेली समाजातील दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच पीएच. डी. पदवीधारक, वयाची ७५ वर्षे पूर्ण करणारे ज्येष्ठ नागरिक, वैवाहिक जीवनाची ५० वर्षे पूर्ण करणारी दाम्पत्ये आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजबांधवांचा विशेष सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्या बरोबरच ज्येष्ठ नागरिक, गुणवंत विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या समाज बांधवांचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. समाजातील विविध घटकांना एकत्र आणून त्यांच्या कायार्ची दखल घेण्याचा संस्थेचा हा प्रयत्न असल्याचे अध्यक्ष नरेंद्र कुमार दिवटे यांनी सांगितले. या कार्यक्रमाला नागरिक, विद्यार्थी, पालक तसेच समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जवाहर विद्यार्थी गृहचे अध्यक्ष नरेंद्र कुमार दिवटे, मुख्यकार्यवाह हर्षवर्धनजी बेले व संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे. यावेळी नरेंद्रकुमार दिवटे, बालानंद टापरे, प्रज्ञा बडवाईक, प्रवीण अंबागडे, लोकनाथ भुरे, रमेश पिसे, प्रफुल रेवतकर, विजय मोटघरे, हरिष जयपूरकर, देवेंद्र वाडीभस्मे, प्रकाश तिळगुळे, हरिष दांडेकर यांची उपस्थिती होती.

## नगर परिषद वाडीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा स्वच्छता मोहिमेत सहभाग, आज श्रमदान

### 'एक दिवस, एक तास, एक साथ' उपक्रमांतर्गत पोलीस स्टेशन परिसरात स्वच्छता मोहीम

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

स्वच्छ भारत अभियानाला बळकटी देण्यासाठी आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने नगर परिषद वाडीच्यावतीने 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत 'एक दिवस, एक तास, एक साथ' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता वाडी पोलीस स्टेशनजवळ श्रमदान व स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत प्राप्त निर्देशांनुसार दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत देशभरात 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा राबविण्यात येत आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून नगर परिषद वाडी, जवाहरलाल नेहरू अर्बन रिन्यूअल मिशनअंतर्गत कार्यरत सिस्टर डेव्हलपमेंट अँड डिझाइन सेंटर तसेच वाडी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

## सशस्त्र दलातील अधिकारी पदासाठी मोफत पूर्व प्रशिक्षणाची संधी

### एसएसबी-६७ कोर्ससाठी १५ ऑक्टोबरला नागपुरात मुलाखती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय सशस्त्र सैन्य दलाच्या तिन्ही दलांमध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी इच्छुक महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने मोफत पूर्व प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. छात्र पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे एसएसबी-६७ या परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी विशेष प्रशिक्षण कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण १९ ते २८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणार आहे. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना निशुल्क प्रशिक्षणासोबत निवास व भोजनाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांनी १५ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नागपूर येथे मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नागपूर यांनी केले आहे.

एसएसबी-६७ प्रशिक्षणाबाबत अधिक माहितीसाठी छात्र पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथील प्रभारी अधिकाऱ्यांशी संपर्क साधता येईल. यासाठी ई-मेल : training.pctcnashik@gmail.com, दूरध्वनी ०२५३-२४५१०३२ तसेच व्हॉट्सअप क्रमांक ९१५६०७३३०६ उपलब्ध आहे. इच्छुकांनी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा.

# पेंच व्याघ्र प्रकल्पात सफारी आजपासून पर्यटकांना वाघाचे दर्शन

### वनविभागासह पर्यटकही झाले सज्ज, ऑनलाइन बुकिंग सुरु



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक (हर्ष कनोजे)**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर बंद असलेली पेंच व्याघ्र प्रकल्पातील पर्यटन सफारी आता १ ऑक्टोबरपासून पुन्हा सुरू होत आहे. त्यामुळे जंगलप्रेमी, वन्यजीव छायाचित्रकार आणि पर्यटकांना पावसाळ्यानंतर हिरवाईने नटलेल्या पेंचचे नवे रूप अनुभवता येणार आहे. सफारी सुरू होण्यापूर्वीच पर्यटकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यापर्यंतचे अनेक सफारी स्लॉट बुक झाल्याची माहिती आहे. पावसाळ्यात जंगलातील नैसर्गिक परिसंस्थेचे संवर्धन, वन्यजीवांच्या प्रजननाचा कालावधी तसेच वनव्यवस्थापनाची विविध कामे लक्षात घेऊन कोअर क्षेत्रातील पर्यटन बंद ठेवण्यात येते.

या विश्रांतीनंतर आता जंगल पुन्हा पर्यटकांच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे. पावसामुळे पेंचतील गवताळ प्रदेश जलसाठे, बांबूची बेटे आणि झाडाझुडपांना नवसंजीवनी मिळाली आहे. त्यामुळे यंदाच्या पर्यटन हंगामात पेंचचे हिरवेगार आणि निसर्गरम्य रूप पर्यटकांना पाहता येणार आहे. सफारीच्या प्रवेशद्वारांमधून पर्यटकांना जंगलभ्रमंती करता येते. पेंच परिसरात वाघांसह बिबट्या, अस्वल, रानकुत्रे, सांबर, चितळ, गवा तसेच विविध प्रजातींचे पक्षी आणि अन्य वन्यजीव आढळतात. पावसाळ्यानंतर जंगलातील पाणवठे, तलाव आणि गवताळ भागांमध्ये वन्यजीवांची हालचाल वाढते. त्यामुळे ऑक्टोबरपासून सुरू होणारा पर्यटन हंगाम वन्यजीवप्रेमींसाठी विशेष आकर्षणाचा ठरणार आहे. वाघाच्या दर्शनासोबतच ताडोबाची समृद्ध जैवविविधता अनुभवण्याची अनुभवण्याची संधी पर्यटकांना मिळणार आहे. दरम्यान, सफारीसाठी पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून, आगामी नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यातील बुकिंगला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे पर्यटन व्यवसायाशी संबंधित हॉटेल, रिसॉर्ट, वाहनचालक, गाईड आणि स्थानिक व्यावसायिकांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

**बफर क्षेत्रात राहते 'टायरगरची मुव्हमेंट'**

१९७५ मध्ये व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा मिळालेल्या रामटेक तालुक्यातील पेंच व्याघ्र प्रकल्पाचा कोअर झोन ४३९.८४ कि. मी, तर बफर झोन २०५.०३ कि.मी. इतका आहे. या व्याघ्र प्रकल्पात सुमारे ५५ अधिक प्रौढ वाघांचे वास्तव्य आहे. या व्याघ्र प्रकल्पाचे कोअर क्षेत्र वाघ, बिबट, अस्वल आदी वन्य जीवांच्या संवर्धनासाठी उपयुक्त ठरत पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातही वाघांची मुव्हमेंट असते.

१ ऑक्टोबरपासून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पर्यटन सफारी पुन्हा सुरू होत आहे. सफारीदरम्यान वन विभागाने निर्धारित केलेले नियम, वेळा आणि मार्गदर्शकांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. पर्यटकांचा सुरक्षित आणि निसर्गपूरक अनुभव हे वन विभागाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. **यावर्षी विदेशी पर्यटकांना सोयीचे व्हावे यासाठी सिल्लारी पर्यटन गेट**

**उपलब्ध सफारी**

वाहन - १०१
निसर्ग निर्देशक - ४५
कॅनटर सफारी वाहन - २

**अमलतास पर्यटन संकुल, सिल्लारी**

उपलब्ध निवासी खोल्या -
इकोलक्स रूम्स (एसी)- १८
इकोझी हट (नॉन एसी) - ४
इको टेंट (एसी) - २
एकूण खोल्या - २४

### इतर सुविधा

▶ टायगर टेल मेझियम ▶ आदिवासी समुदाय केंद्र ▶ सभागृह ▶ मोगली कॉन्फरन्स हॉल ▶ स्मरणिका दुकान ▶ अमलतास कॅन्टीनचे किचन ▶ सेल्फी पॉइंट ▶ पर्यटकांसाठी टी हाऊस ▶ प्लॅस्टिक मुक्त पाणी संयंत्र प्रकल्प

पर्यटकांचे सोयीचे व्हावे म्हणून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सफारी लाभ घेण्यासाठी अधिकृत वन विभागाच्या संकेतस्थळावरुनच बुकिग करावे.

**- निलेश गावंडे**
**वनपरिक्षेत्र अधिकारी, पेंच व्याघ्र प्रकल्प, सिल्लारी**

## गोरेघाट येथे 'क्रॉपसॅप' अंतर्गत शेती शाळा संपन्न

### भात पिकातील कीड-रोग व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बांधावर मार्गदर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, काचुरवाही**

कृषी विभागाच्या वतीने कीड व रोग सर्वेक्षण तसेच सल्ला प्रकल्पांतर्गत 'क्रॉपसॅप' उपक्रमाच्या माध्यमातून गोरेघाट, ता. रामटेक येथे शेती शाळेचा वर्ग क्रमांक ४ उत्साहात पार पडला. भात पिकाच्या शेतात प्रत्यक्ष बांधावर आयोजित करण्यात आलेल्या या शेती शाळेला परिसरातील महिला व पुरुष शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शेती शाळेत सहाय्यक कृषी अधिकारी श्री. एम. एम. भोरे व श्री. डी. डी. वळवी यांनी उपस्थित राहून शेतकऱ्यांना भात पिकातील विविध कीड व रोगांचे व्यवस्थापन, प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी कृषी अधिकाऱ्यांनी शेतात प्रत्यक्ष पाहणी करून पिकांवर आढळणाऱ्या विविध किडी व रोगांची ओळख करून दिली. मित्र कीटक आणि शत्रू कीटक यांची अचूक ओळख कशी करावी, याचे प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन करण्यात आले. पिकांवरील किडींचे नियंत्रण करण्यासाठी रासायनिक कीटकनाशकांचा अनावश्यक वापर टाळून एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले.

तसेच कामगंध सापळे (फेरोमोन ट्रॅप), पिवळे व निळे चिकट सापळे यांचा वापर, त्यांची शेतात योग्य ठिकाणी उभारणी तसेच जैविक कीटकनाशकांचा योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात वापर करण्याबाबत शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. पिकांमध्ये कीड व रोगांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास वेळीच उपाययोजना केल्यास उत्पादनाचे नुकसान टाळता येते, असेही यावेळी सांगण्यात आले. शेतकऱ्यांनी शेतात प्रत्यक्ष जाऊन पिकांची पाहणी करून समस्या समजून घेणे आणि उपलब्ध तांत्रिक मार्गदर्शनाचा योग्य वापर करणे आवश्यक आहे.

अशा शेती शाळांमुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बांधावर मार्गदर्शन मिळत असून उत्पादन खर्च कमी करण्यास तसेच पिकांचे नुकसान टाळण्यास मदत होत असल्याची भावना उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला गोरेघाट व परिसरातील शेतकरी बांधव तसेच महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये आधुनिक व पर्यावरणपूरक कीड व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होत आहे.

## संत शरण दास उर्फ मौनी बाबांचे १०५ व्या वर्षी निधन : कळमना आश्रमावर शोककळा

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर :-(धनंजय पांढरे)**



बल्लारपूर तालुक्यातील कळमना येथील आश्रमात अनेक वर्षांपासून साधना आणि अध्यात्मिक जीवन व्यतीत करणारे संत शरण दास उर्फ मौनी बाबा यांचे बुधवारी नागपूर येथील एका खासगी रुग्णालयात निधन झाले. ते १०५ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाची वार्ता कळमना तसेच बल्लारपूर परिसरात पसरताच भक्त आणि श्रद्धाळूंमध्ये शोककळा पसरली. संत शरण दास यांनी कळमना येथे आश्रमाची स्थापना करून अनेक वर्षे साधना केली. त्यांनी दीर्घकाळ मौनव्रत स्वीकारले होते. त्यामुळे परिसरातील भाविकांमध्ये ते मौनी बाबा म्हणून परिचित झाले होते. त्यांच्या दर्शनासाठी आणि आशीवार्दासाठी बल्लारपूरसह चंद्रपूर जिल्ह्यातील तसेच इतर भागांतील भाविक नियमितपणे आश्रमात येत होते.

मौनी बाबांच्या निधनाची माहिती मिळताच कळमना येथील आश्रमात भक्तांची गर्दी होऊ लागली. त्यांच्या अंतिम दर्शनासाठी दूरवरून श्रद्धाळू दाखल होत असून, आश्रम परिसरात भावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. भक्त अभियंता वैभव जोशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, संत शरण दास उर्फ मौनी बाबांचे अनेक भक्त हरियाणामध्येही आहेत. हरियाणाहून भक्त आल्यानंतर त्यांच्या उपस्थितीत बाबांच्या समाधीबाबतची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.मौनी बाबांना समाधी देऊन अंत्यसंस्कार करण्यात येणार असून, गुरुवारी भक्तांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडणार आहे. दीर्घकाळ साधना, मौनव्रत आणि आध्यात्मिक जीवनामुळे मौनी बाबांनी भक्तांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले होते. त्यांच्या निधनाने अनुयायांमध्ये हळहळ व्यक्त होत असून, अंतिम दर्शनासाठी आश्रमात भक्तांची गर्दी वाढत आहे. कळमना परिसरात सध्या शोकाकुल वातावरण आहे.

## हलबा समाज महासंघाच्या ५१ व्या वार्षिक आमसभेत समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे तसेच विद्यार्थ्यांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हलबा समाज महासंघाची ५१ वी वार्षिक आमसभा दिनांक २७ सप्टेंबर रोजी, महासंघाचे दिनदयाल नगर येथील सांस्कृतिक भवनात संपन्न झाली. या सभेत मोठ्या संख्येत पदाधिकारी सदस्य आमंत्रित नवनियुक्त नगरसेवक प्राविण्यप्राप्त विद्यार्थी इत्यादि मान्यवरांची उपस्थिती होती.

आमसभेच्या निमित्यानी उपस्थित सर्व सदस्य पदाधिकारी आणि विज्ञार्थी करिता प्रारंभास महासंघातर्फे श्री श्री रविशंकर यांचे आर्ट ऑफ लिव्हिंग नागपूर तर्फे नवचेतना शिबिराचे आयोजन करून स्वस्थ मन शांत मन आनंदमय जीवन जगण्याकरीता ज्ञान- घ्यान- गान या संकल्पनेवर आधारित या शिबिरामध्ये तणावमुक्त जीवन आत्मविश्वास व सर्जनशिलता वाढविने मानसिक शांतता व एकाग्रता सुधारणे कौशल्य विकास तसेच निरोगी जीवनशैली या सारख्या विषयांवर मार्गदर्शक सर्वश्री कांचन हटवार सौरव आणि वरूण यांच्या व्दारे मार्गदर्शनाचा मोठ्या प्रमाणात उपस्थित सभासद व विज्ञार्थी मित्रांनी शिबिराचा लाभ घेतला.

सर्वप्रथम महासंघाचे अध्यक्ष प्राध्यापक डॉ. देवराम नंदनवार यांनी आमसभेला मोठ्या संख्येने उपस्थित सर्व मान्यवर पदाधिकारी सदस्य विज्ञार्थी विशेष प्राविण्यप्राप्त समाज बांधवाचे शब्दसुमनाने स्वागत केले व त्यानंतर दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली अर्पन करण्यात आली. आमसभेच्या कार्यपदधती अनुसार मागील ५० वी आमसभेच्या कार्य वृत्ताचे वाचन व त्यास स्विकृती प्रदान करण्यात आली.

संस्थेचे महासचिव डॉ रमेश पराते याचे व्दारे अहवालाचे वाचन व




वर्ष २०२५-२६ आर्थिक वर्षामधील जमा- खर्च खाते आय व व्यय खाते ताळेबंध विवरण व वर्ष २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रक मंजूर करण्यात आले. या आमसभेच्या निम्मीत्ताने मान्यवराचे सत्कार कार्यक्रमात आवर्जुन उपस्थित असलेले सर्व नवनियुक्त नगरसेवक सर्वश्री प्रविण बरडे, कल्पक भनारकर दिलीप दिवे व निधी तेलघोटे इत्यादि व समाजातील विविध क्षेत्रातील नैप्युण्य / प्राविण्यप्राप्त जसे आचार्यपद पीएचडी विशेष कामगिरी प्राप्त समाजबांधव विद्यार्थी व वयाची ७५ वर्षे पुर्ण झालेल्या महासंघाचे आजीवन सभासद इत्यादि मान्यवरांचे गौरव व सत्कार त्यांना शाल श्रीफळ व मानचिन्ह देवून करण्यात आले. महासंघाव्दारे प्रत्येक वर्षी अनुसार २२२ दहावी बारावी व उच्च शिक्षणात प्राविण्यप्राप्त विद्यार्थांना ८.५ लाख रूपये रोख पुरस्कार व शिष्यवृत्ती देण्यात आली.

आमसभेच्या अध्यक्षिय संबोधनात डॉ. देवराम नंदनवार यांनी वर्षभरात महासंघाव्दारे राबविलेले विविध उपक्रमाची माहिती दिली.

मानवताची सेवा हिच जीवनाचे सर्वोत्तम कार्य आहे लक्षात घेवून खापा मोहाडी भंडारा इत्यादि विविध गावात निःशुल्क हेल्थ चेकअप व डोळे तपासनी आणि असंख्य चश्मा वितरण करण्यात आले व उन्हाळयात नागपूर शहरात विविध ठिकाणी पाणिपोई लावण्याची आलेली होती तसेच सभागृहाची सुसज्ज सुशोभनिय रूप महासंघाची निरंतर प्रगतिशिल कार्यवाहि व सर्व कार्यकारीणीचे अमुल्य सहयोग याची माहिती दिली व उपस्थिताचे अमुल्य सहकार्या करिता आभार व्यक्त केले.

या कार्यकमाला यशस्वीरित्या पार पाडण्याकरीता महासंघाची कार्यकारिणी सदस्य सर्वश्री विश्वनाथ धकाते, वामन खापेकर, अशोक निमजे, हरीभाऊ वरूडकर, मनोज हेडाउ, लक्ष्मण मोहाडीकर, मगलमुर्ती सोनकुसरे, सुधाकर कुभारे, योगेश गोन्नाडे, पुरूषोत्तम कोहाडकर, देवेन्द्र बोकडे, संध्या पराते, रवि पराते, परमानंद पराते, चंद्रकांत वैध, शांताराम पौनिकर, विनायकराव परोते, प्रकाश पाठराबे, श्रीकृष्ण निपाणे, तुकाराम कोहाडे, व्यवस्थापक बालाजी गाठीबांधे आणि उषा राखडे इत्यादिनी सहकार्य केले. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे सल्लागार अनिल नंदनवार यांनी कळविले आहे.

# नागपूरातील पितृपक्षातील 'हाडपक्या गणपती उत्सव' देशाचा ऐतिहासिक वारसा

रमेश लांजेवार
नागपूर

हाडपक्या गणपती ज्याला आपण मस्कऱ्या गणपती असेही म्हणतो. याची सुरुवात इ.स. १७८७ मध्ये झाली. नागपूरचे भोसले घराण्यातील राजे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले (उर्फ चिमणाबापू) यांनी या अनोख्या ऐतिहासिक उत्सवाची सुरुवात केली आणि या उत्सवाला २३९ वर्षे पूर्ण होत आहे.पितृपक्षामध्ये धार्मिक कार्यक्रमासह पारिवारिक कार्यक्रम किंवा शुभकार्य करणे टाळले जाते.परंतु पितृपक्षाच्या काळातही प्रामुख्याने विदर्भात २३९ वर्षांपासून हाडपक्या (मस्कऱ्या) गणपती उत्सव साजरा करण्यात येतो.यामागे सुध्दा ऐतिहासिक परंपरा व संस्कृती आहे.नागपूरातील प्राचीन परंपरेतील ऐतिहासिक उत्सव म्हणजे 'हाडपक्या गणपती'. हा उत्सव गणेशेत्सव संपल्यानंतर सुरू होतो. नागपूरसह विदर्भातील अनेक जिल्ह्यांत हाडपक्या गणपती उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो.

हा गणपती उत्सव घरघुती स्वरूपाचा नसुन सार्वजनिक स्वरूपाचा असतो. विदर्भात पितृपक्षाला 'हाडपक' म्हटले जाते, या काळात नागपूरच्या ऐतिहासिक भोसले राजवाड्यात जो हाडपक्या (मस्कऱ्या) गणपती उत्सव साजरा केला जातो, त्या गणपतीच्या मूर्तीला पारंपरिकपणे शिल्परचनांनुसार १८ हात असतात म्हणजेच १८ रूपे हा या मागचा उद्देश;अठरा हातांचे विशेष रहस्य महालक्ष्मी आणि विघ्नेश्वर रूपः काही विशिष्ट प्राचीन शिल्पकलांमध्ये किंवा संयुक्त स्वरूपाच्या मूर्तींमध्ये महालक्ष्मी जिचे १४ हात मानले जातात आणि गणपतीचे ४ हात यांचे एकत्रित रूप दर्शवले जाते.

एकत्रित हातः या संयुक्त स्वरूपात एकूण १८ हात हाडपक्या गणपतीला असतात म्हणजे संपूर्ण शक्ती गणरायामध्ये सामावलेली असते. म्हणजे सर्व रूपांनी नटलेला विघ्नहर्ता गणराया. पुर्वी मोठ्या प्रमाणात सार्वजानिकरीत्या हा उत्सव साजरा होत असत. परंतु कालांतराने आता काही मोजक्याच ठिकाणी हा उत्सव साजरा केला जातो. विदर्भात "पितृपक्षाला" "हाडपक" असेही म्हणतात. म्हणून हाडपकात बसविलेल्या गणपतीला" हाडपक्या गणपती" असेही संबोधले जाते. राजे भोसले यांचे नागपूरात आगमन झाल्यानंतर अनेक प्रथा व परंपरांची सुरुवात झाली. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला घरगुती गणेशोत्सवाला सुरुवात होते व याला मोठे सार्वजनिक स्वरूप सुध्दा दिले जाते आणि हा उत्सव दहा दिवस चालतो. घरगुती गणेश विसर्जन झाल्यानंतर जी पितृपक्षातील चतुर्थी येते त्या कृष्णपक्ष संकष्ट चतुर्थीला हाडपक्या गणपतीची स्थापना केली जाते.



नागपूरकर भोसले घराण्यातील श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले (चिमणा बापू) हे बंगालच्या स्वारीवर गेले होते आणि त्यांच्या परतीच्या प्रवासात म्हणजे १७८७ मध्ये नागपुरात 'हाडपक्या' गणपती उत्सवाची परंपरा सुरू झाली आज या उत्सवाला २३९ वर्षे पूर्ण होत आहेत. बंगालवर ऐतिहासिक विजय मिळवून परत येत असताना कुळाचारी गणपतीचे विसर्जन झाले होते. त्यामुळे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले गणपती उत्सव साजरा करू शकले नाही. त्यावेळी राजपुरोहित व अन्य विद्वानांसोबत चर्चा करून पितृपक्षातील भाद्रपद कृष्ण चतुर्थी (भाद्रपद संकष्टी चतुर्थी) ला गणपती उत्सव साजरा करण्याचे ठरविले आणि त्यासोबत बंगालवर ऐतिहासिक विजय मिळविण्याच्या आनंदोत्सव सुद्धा सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले.

तेव्हापासून हाडपक्या गणपतीला सुरूवात झाली आहे.त्यामुळे याला विजयत्सोव सुध्दा म्हणता येईल. याकाळात लावण्या, नकला, भारूड, खडीगंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असे. यावेळी अनेक गंमती-जमतीचे कार्यक्रम होत असत त्यात थट्टा, मस्करी,नाटक खडी गंमत इत्यादीं मनोरंजनात्मक कार्यक्रमाचा भडीमार होत असत म्हणजेच कार्यक्रमाच्या माध्यमातून मस्करी व्हायची यातुनच "मस्कऱ्या" हे स्थानीय बोलीभाषेतील नाव प्रचलित झाले आणि पितृपक्षातील गणपतीला मस्कऱ्या गणपती' नावाने प्रसिद्धी मिळाल्याचे सांगितले जाते.

असे म्हणतात की, लोकमान्य टिळकांनी याच गणपती उत्सवाची प्रेरणा घेऊन भाद्रपद शुद्ध गणेश चतुर्थीला गणपती उत्सव सार्वजानिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले आणि यातूनच त्यांनी स्वातंत्र्याचा लढा उभा केला व स्वतंत्र्याची मशाल प्रज्वलित केली.

हाडपक्या गणपती उत्सवाचा मुख्य सोहळा नागपूरातील भोसले राजवाडा, महाल येथे आयोजित करण्यात येते. या उत्सवाला आज २३९ वर्षे पूर्ण होत आहेत म्हणजेच ही ऐतिहासिक परंपरा आहे. श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले यांच्या काळात हाडपक्या गणपतीची स्थापन केली जात होती. तीच परंपरा आजही आपल्याला विदर्भात पहायला मिळते. त्याच प्रकारची मूर्ती स्थापन करण्यात येते. त्याकाळी लावण्या, भारूड, पोवाडे, खडी गंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जायचे. परंतु आता कालांतराने वेगवेगळे मनोरंजनात्मक कार्यक्रम आले यात आर्केस्ट्रा, सुगम संगीत, नाटक, समाजप्रबोधन, नवीन पिढीला आनंद देणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजित करण्यात येते. हा उत्सव सलग दहा दिवस साजरा करण्यात येतो. या दरम्यान महाप्रसादचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो व भाद्रपद कृष्ण द्वादशीला गणपती उत्सवाची सांगता होते आणि हाडपक्या गणपतीचे विसर्जन करण्यात येते.

यामुळे लक्षात येते की भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सणाला व उत्सवाला आगळेवेगळे महत्त्व असून त्याला अत्यंत महत्व असते.मग तो कोणत्याही धमार्चा उत्सव असो यातुनच आपली जडणघडण व विविधता दिसून येते,आपण परीपक्व होतो व आपल्या परिवाराला संस्कृतीतून चांगली चालना मिळते.

यामुळेच आज संपूर्ण जग भारतीय संस्कृतीकडे आकर्षित झाल्याचे दिसून येते.ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे. त्याकाळी भोसले घराण्यातील राजे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले (उर्फ चिमणाबापू) यांनी बंगालमध्ये इंग्रजांशी कडवी झुंज दिली व विजय प्राप्त केला.त्याच धर्तीवर आपल्याला बदलत्या हवामानावर विजय प्राप्त करण्यासाठी कडवी झुंज देण्याची गरज आहे.कारण वाढते औद्योगिकीकरण, जंगलतोड, शहरीकरण, सिमेंटीकरण यामुळे हवामानात आमुलाग्र बदल होत असल्याने मोठ्या प्रमाणात प्रदुषणाचे प्रमाण वाढल्याने वृक्षलागवड करण्याची नितांत गरज आहे. कारण येणाऱ्या काळात बदलत्या हवामानामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे.यावर नियंत्रण ठेवण्यासाठी व पुढील पिढीला सुरक्षित करण्यासाठी हाडपक गणपती उत्सवाच्या निमित्ताने दहा दिवसांच्या काळात सरकारने, सामाजिक संघटनांनी, शाळा-महाविद्यालयांनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून हिरवागार गालिचा निर्माण करून निसर्ग प्रफुल्लित करावा. पुर्वी राजे-महाराजे निसर्गाच्या सान्निध्यात रहायचे त्याचे अनुकरण आपण वृक्षलागवडीच्या रूपात करून निसर्गरम्य वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी आपणासर्वांवर आली आहे.त्या अनुषंगाने हडपक्या गणपती उत्सवाप्रमाणे सर्वत्र निसगार्चा विजय उत्सव साजरा व्हावा अशी गणरायाच्या चरणी प्रार्थना करतो.गणपती बाप्पा मोरया!

– ९९२१६९०७७९

# स्त्रीजाणीवेची सशक्त कविता : गहिवरल्या क्षणांचा कोलाज

कविता हा प्रकार केवळ वाचन करण्याचा विरंगुळा नाही तर मनावर उमटणारी ती एक छाप आहे.काही कविता वाचताना वाचकाला असा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही.

दिनेश बसेने यांचा नुकताच चर्चेत असणारा 'गहिवरल्या क्षणांचा कोलाज' हा प्रकाशित काव्यसंग्रह मला वेगळ्याच क्षणांचा ठाव देत आहे. कविवर्य दिनेश सरांनी आपल्या संग्रहातून निव्वळ कविताच नव्हे तर कुणाच्या भावना, संवेदना, पडद्याआड असलेल्या स्त्री-भुमिका, ज्या नसतात कधी समाजमान्य वा समाज नसतोच करत कधी त्यावर उघडी नजर अशा अस्सल कविता आणि गोष्टी ज्या नसतात माहिती या कानाच्या त्या कानालाही,ज्या असतात तुमच्या आमच्या जाणीवांसी रूबरू, त्याच बेताच्या कविता कवीने प्रखर आणि नितळ भावनेने मांडलेल्या दिसताहेत.

"ती गुंतत गेली
त्याच्या पाणीदार डोळ्यांत
तिचेही ओठ पाण्याशिवाय
सुकलेले
समागमानंतरही त्याला
स्वप्नदोष व्हावा
मग कुठं तिला कळलं होत-
पुरुषाच्या पोटात
खूप पाणी दडलयं
स्वतःचा देह हलवू न देणारं"

संग्रहातील 'पाणी' नावाची ही कविता अस्वस्थ करणारी ठरते.आणि स्त्री-पुरुष भावनांची साद यातून प्रखरतेने उमटून येते..

"रिकामं भरलं जातं
भरलेलं रिकामं होतं
या प्रवासात ती मात्र
स्वतःची तहान विसरते."

हेचं स्त्रियांच्या बाबतीत घडत असावं बहुतेक..

कवीने खरतरं स्त्रीवादी आयुष्य जगलं असावं, जगलचं नव्हे तर ते तळहाताच्या फोळागत जपलंही असावं. असं या काव्य संग्रहातून दिसून येते.

"भोगून झाल्यावर
त्याने तिला विचारले
बाईत असं का असते ?
ती आवेगात म्हणाली,
बाईत अनंत बिंदू असतात
ज्यांच्यातून असंख्य रेषा
निघतात




पुरुष असमांतर चालतो
त्या रेषांनी
तिला वर्तुळात घेऊन.."

ही कविता स्त्री-पुरुष या दोन्ही पैलूचे झाकून असलेले संवाद प्रखरतेने उघडीस आणते.

कवी दिनेश बसेने हे मानवतावादी पुरुष जरी असले तरी त्यांनी खऱ्या अर्थाने वा निसंकोचपणे स्त्री-जीवन अगदीच जवळीकतेने जाणले असावे वा भोगले असावे.

बिंदू, शेजारच्या पोरी,
कपडे नसलेली अक्षरे, आयुष्य,
मला आवडतं, सोनं, अर्थपूर्ण,
सारेचं रंग तुला आवडतात इ..

या संग्रहातील प्रत्येकच कवितेतून कवी फारचं बोलका आणि अस्सल कवितेच्या जगात जगत असल्याचे दिसून येते. या कविता संग्रहाने माझ्या मनावर एक वेगळ्याच प्रकारची 'छपाक' दिली आहे. आणि अर्थपूर्ण हाक..

स्त्री-जीवनाशी निगडित असलेला हा कवितासंग्रह वाचून मला अतृप्त झाल्याचा भास जाणवतोय. यंदाच्या चांगल्या काव्यसंग्रहातील हा एक काव्य संग्रह वाचकांच्या मनात घर करेल असे दिसून येते. दिनेश बसेने यांचा 'गहिवरल्या क्षणांचा कोलाज' या संग्रहाचे स्वागत आहे.

या संग्रहाचे प्रकाशक, संजय शिंदे, अष्टगंध प्रकाशन आणि संग्रहाच्या नावाला शोभेलसं, साजेसं मुखपृष्ठ संतोष घोंगडे यांनी केले आहे. पहिला युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी आ. ऐश्वर्य पाटेकर यांनी या संग्रहाला प्रस्तावना दिली आहे. आणि पाठराखण शेतीमातीशी नाळ आणि मातीशी संवाद साधणारी कवियत्री आ. कल्पना दुधाळ यांनी केलेली आहे. कवी कवितेतून बोलका झाला आणि समाजासमोर आपली अस्सल आणि खरीखुरी छबी दाखवितोय इथेही हा कवी श्रेष्ठ झालाय...

– राकेश सं. खलासने
रा. कुंभापूर
ता. मौदा. जि.नागपूर
९६२३३४२४९२

# हृदयाचे आरोग्य

जगात,राष्ट्रात मानवी सुखाच्या कल्पनेतून प्रत्येक दिवस हा काहीतरी विशेष वैशिष्ट्यांनी साजरा केला जातो तसाच आपल्या शरीरातील अत्यंत महत्त्वाचा अवयव हृदय याकडे आरोग्याच्या दृष्टीने जनतेचे लक्ष वेधण्यासाठी आज २९ सप्टेंबर हृदयदिन म्हणून साजरा केला जातो. आज विशेषकरून आपल्या देशात हृदयविकाराचे प्रमाण खूप वाढले आहे, तरुण वायात सुद्धा हृदयघात होत आहेत ही चिंतेची बाब आहे. हृदयाला निरोगी, सुस्थितीत, मजबूत ठेवण्यासाठी आपली रोजची दिनचर्या, योग्य अयोग्य खानपान, व्यसन, मानसिक स्थिती याच्याशी संबंधित असते यावरच आपल्या हृदयाचे आरोग्य अवलंबून आहे. आपली जर दिनचर्या योग्य नसेल तर म्हणजे रात्री उशिरा झोपणे सकाळी उशिरा उठणे, व्यायामाचा अभाव, बसून काम करणारे व्यावसायिक नोकरदार यांच्या शारीरिक हालचाल कमी झाल्याने शरीरात महत्वाचे अवयव हृदय मेंदू यांना रक्तपुरवठा व्यवस्थित न झाल्याने हृदय मेंदूचे विकार होऊन पक्षाघात , उच्च रक्तदाब, हृदयघात याचे धोके उद्भवू शकतात.हे टाळण्यासाठी आपल्या दिनचर्येत बदल करून अर्धा ते एक तास व्यायाम करणे आवश्यक आहे.




दुसरे म्हणजे खानपान फास्ट फूड, डबाबंद पदार्थ, बाजारात तयार मिळणारे खाद्य पदार्थ, जास्त तेलकट तळलेले पदार्थ, जास्त प्रमाणात तुपाचा वापर,जेवणात सॅलड,भाज्याचा वापर कमी असने, वेळेवर न जेवणे यामुळे हृदयाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो आणि हृदयाचे आरोग्य चांगले राहात नाही. महत्वाचे म्हणजे व्यसनाधीनता दारूचे अति सेवन, ड्रग्स नशा , धुम्रपान, गुटखा, तंबाखू चे सेवन यामुळे रक्तातील खराब कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढून रक्तपुरवठा कमी होऊन अचानक हृदयघाताचा झटका येऊ शकतो.ज्यांना मधुमेह आहे त्यांनी आपल्या रक्तातील साखर नियंत्रणात ठेवावी आणि आपल्या मनाची मानसिक स्थिती आणि हृदय याचा जवळचा संबंध आहे ही बिघडण्यासाठी, कोणत्याही गोष्टीची अति हाव , मनात सतत द्वेष मत्सर, विनाकारण जळफळाट, ताणतणाव यामुळे रक्तदाब वाढून हृदयविकार होण्याची शक्यता असते, यासाठी नेहमी हसतमुख आनंदी तसेच सर्वांशी प्रेमाने राहिल्याने हृदय निरोगी राहण्यासाठी मदत होईल.

– डॉ. प्रकाश पांडे, वाशीम

# विनोद कांबळी : काय होतास तू, काय झालास तू?

**६६४ धावांच्या विक्रमी भागीदारीपासून उपचार केंद्रापर्यंतचा प्रवास; प्रतिभा, शिस्त आणि अपूर्ण राहिलेल्या शक्यतेची हृदयस्पर्शी कहाणी**

डॉ. दत्ता विघावे,
क्रिकेट समीक्षक

कधीकाळी मुंबईच्या क्रिकेट मैदानावर बॅट हातात घेतली की गोलंदाजांच्या मनात धडकी भरवणारे नाव... शाळेच्या मैदानावर सचिन तेंडुलकरसोबत ६६४ धावांची ऐतिहासिक भागीदारी करणारा प्रतिभावंत... रणजी पदार्पणात पहिल्याच चेंडूवर षटकार ठोकणारा धडाकेबाज फलंदाज... आणि शेन वॉर्नसारख्या महान फिरकीपटूच्या एका षटकात २२ धावा कुटण्याची क्षमता असलेला आक्रमक फलंदाज—आज त्याच विनोद कांबळींचे नाव आरोग्याच्या समस्यांमुळे उपचार आणि देखभालीच्या केंद्राशी जोडले जाते. हे चित्र पाहताना क्रिकेटप्रेमींच्या मनात एकच प्रश्न उमटतो, 'काय होतास तू... काय झालास तू?'

शारदाश्रम विद्यामंदिरच्या मैदानावर सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळी यांनी केलेली ६६४ धावांची भागीदारी भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील सर्वाधिक गाजलेल्या शालेय विक्रमांपैकी एक आहे. विशेष म्हणजे त्या भागीदारीत कांबळींचा वाटा सचिनपेक्षाही मोठा होता. एवढेच नव्हे, तर त्यांनी गोलंदाजीतही प्रभाव दाखवत सहा बळी घेतले. त्या वयातच त्यांच्या अंगी असलेली फलंदाजीची ताकद, गोलंदाजीची क्षमता आणि मोठी खेळी करण्याची वृत्ती पाहता क्रिकेट जाणकारांना या मुलामध्ये काहीतरी विलक्षण आहे, हे जाणवत होते.

त्या सामन्याशी जोडला गेलेला एक किस्साही त्यांच्या स्वभावाची झलक देतो. रमाकांत आचरेकर सरांना डाव लवकर घोषित करून प्रतिस्पर्धी संघाला बाद करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, अशी इच्छा होती. सचिनने कांबळींना सरांचा इशारा सांगितला, तेव्हा कांबळींचा कथित प्रतिसाद होता. 'माझं नाव सांगून दे!' हा प्रसंग खरा किती आणि त्यातील रंग किती, यापेक्षा त्यातून कांबळींच्या व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू नक्की दिसतो, स्वतःच्या क्षमतेवर प्रचंड विश्वास, बेधडकपणा आणि कधी कधी हट्टीपणाच्या सीमेला जाऊन पोहोचणारा आत्मविश्वास.

आचरेकर सरांच्या तालमीत तयार झालेले सचिन आणि कांबळी पुढे दोन वेगळ्या वाटांनी गेले. दोघांकडे प्रतिभा होती, दोघांकडे धावांची भूक होती, दोघांनी मोठी स्वप्ने पाहिली होती; पण प्रतिभेला शिस्त, सातत्य, संयम आणि दीर्घकालीन समर्पणाची जोड देण्याच्या बाबतीत त्यांच्या प्रवासात फरक पडत गेला. कांबळींच्या बाबतीत अनेक क्रिकेट जाणकारांनी त्यांच्या कारकीदीर्तील सातत्याचा अभाव आणि व्यावसायिक शिस्तीचे प्रश्न अधोरेखित केले आहेत. हा त्यांच्या संपूर्ण आयुष्याचा अंतिम न्याय नाही; मात्र त्यांच्या कारकीदीर्चा विचार करताना हा मुद्दा दुर्लक्षितही करता येत नाही.

कांबळींच्या गुणवत्तेबद्दल मात्र कोणतीही शंका नव्हती. रणजी पदार्पणात पहिल्याच चेंडूवर षटकार ठोकणारा हा फलंदाज होता. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये मोठ्या गोलंदाजांना न घाबरता आक्रमकपणे खेळण्याची त्यांची वृत्ती होती. शेन वॉर्नसारख्या दिग्गज फिरकीपटूच्या एका षटकात २२ धावा कुटण्याची क्षमता त्यांच्या बॅटमध्ये होती. त्यांच्या फलंदाजीत नैसर्गिक आक्रमकता, मनगटांची ताकद आणि चेंडूवर तुटून पडण्याची वृत्ती होती. म्हणूनच कांबळींची कहाणी ही प्रतिभा नव्हती अशी नाही; उलट प्रतिभा अफाट होती, पण तिचा दीर्घकाळ सातत्याने उपयोग करून घेता आला नाही, ही त्यांची खरी शोकांतिका आहे.

भारतासाठी कांबळींनी १७ कसोटी आणि १०४ एकदिवसीय सामने खेळले. कसोटी कारकीर्द मात्र फारशी लांबली नाही. वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षाच्या आसपास त्यांनी शेवटचा कसोटी सामना खेळला. एकदिवसीय संघात त्यांना पुनरागमनाच्या अनेक संधी मिळाल्या; पण संघातील स्थान कायमचे पक्के करण्यात त्यांना यश आले नाही. एका प्रतिभावान फलंदाजाकडून भारतीय क्रिकेटला जितक्या मोठ्या आणि दीर्घ कारकीदीर्ची अपेक्षा होती, त्या तुलनेत त्यांचा आंतरराष्ट्रीय प्रवास लवकर आटोपला.

कांबळींच्या व्यक्तिमत्त्वाशी जोडलेले अनेक किस्से आजही क्रिकेटविश्वात सांगितले जातात. मैदानावरचा त्यांचा बेफिकीर स्वभाव, सरावाच्या वेळी पतंग उडवण्याच्या कथा, अंगावर सोने घालण्याची आवड किंवा बॅटच्या मूठीवर अनेक ग्रिप लावण्याची त्यांची आगळी पद्धत. हे किस्से त्यांच्या स्वभावातील वेगळेपणा दाखवतात; पण क्रिकेटच्या दृष्टीने त्यापेक्षा मोठा प्रश्न होता. या अफाट प्रतिभेला व्यावसायिक शिस्तीची आणि सातत्याची जोड किती मिळाली?

आणि म्हणूनच सचिन तेंडुलकरशी तुलना अपरिहार्यपणे पुढे येते. सचिन आणि कांबळी हे एका गुरूच्या तालमीत तयार झालेले दोन मित्र. एकाच मैदानावर खेळलेले, एकत्र विक्रम करणारे दोन किशोरवयीन खेळाडू. पण पुढे सचिनने आपल्या प्रतिभेला शिस्तीची भक्कम चौकट दिली. सराव, फिटनेस, तंत्र, आहार, मानसिक तयारी आणि खेळावरील एकाग्रता यांना त्याने आयुष्याचा भाग बनवले. कांबळींच्या प्रवासात मात्र सातत्याचा धागा वारंवार तुटताना दिसला. म्हणूनच ६६४ धावांची भागीदारी आज केवळ एक विक्रम राहात नाही; ती दोन प्रतिभावंतांच्या पुढे वेगळ्या दिशेने गेलेल्या आयुष्यांची प्रतीकात्मक कहाणी बनते.

आज या कहाणीला आणखी एक वेदनादायी वळण मिळाले आहे. अलीकडे समोर आलेल्या व्हिडिओमध्ये विनोद कांबळी ठाण्यातील निदान सेंटर फॉर एल्डर्ली केअर या वृद्धांच्या देखभाल व उपचार केंद्रात दिसले. उपलब्ध वृत्तांनुसार त्यांनी तेथे उपचार घेत असताना केंद्रातील सुविधा, स्वच्छता आणि मिळणाऱ्या आपुलकीबद्दल समाधान व्यक्त केले. काही अहवालांनुसार तेथे त्यांना आरोग्यविषयक उपचार आणि फिजिओथेरपीसारखी मदत मिळाली; नंतर त्यांच्या पत्नीने त्यांना घरी नेल्याचेही वृत्त आले आहे. त्यामुळे त्यांना कायमचे 'वृद्धाश्रमात राहणारे' म्हणून संबोधणे अचूक ठरणार नाही. पण एकेकाळी हजारो प्रेक्षकांसमोर क्रिकेट खेळणारा हा प्रतिभावंत आज आरोग्याच्या अडचणींमध्ये उपचार आणि देखभालीच्या आधारावर आहे, ही वस्तुस्थिती निश्चितच अंतर्मुख करणारी आहे. इथे मात्र आपण थांबले पाहिजे.

कांबळींच्या आजच्या परिस्थितीकडे केवळ त्यांच्या जुन्या निर्णयांची शिक्षा म्हणून पाहणे योग्य नाही. माणसाच्या आयुष्यात आरोग्य, परिस्थिती, वैयक्तिक संघर्ष, आर्थिक-सामाजिक प्रश्न आणि अनेक अनपेक्षित वळणे असतात. एखाद्या खेळाडूच्या कारकीर्दीतील चुका आठवणे सोपे असते; पण त्याच्या आयुष्याच्या कठीण टप्प्यावर त्याला आधार देणे ही खरी माणुसकी असते.

कांबळींच्या कहाणीतील सर्वात वेदनादायी प्रश्न हा ते अपयशी का ठरले? हा नाही; तर ते आणखी किती मोठे होऊ शकले असते? हा आहे. कारण त्यांच्या बॅटमध्ये भारतीय क्रिकेटच्या इतिहासात मोठे स्थान निर्माण करण्याची क्षमता होती. त्यांनी काही संस्मरणीय डाव खेळले, मोठ्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले, भारताचे प्रतिनिधित्व केले; पण त्यांच्या प्रतिभेच्या मानाने त्यांची कारकीर्द अपूर्ण राहिली, ही भावना क्रिकेटप्रेमींच्या मनातून जात नाही.

– ९०९६३७२०८२

# ज्ञानेश कुमार यांच्या अटकेच्या मागणीसाठी काँग्रेसचा सत्याग्रह गोंदियात आंदोलन

## मतदार यादीतील फेरबदलाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अटकेची मागणी तसेच त्यांना पदावरून तातडीने दूर करण्याच्या मागणीसाठी गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने गोंदिया येथे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. निवडणूक आयोगाच्या कारभाराबाबत जनतेमध्ये तीव्र नाराजी असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. मतदार यादीत अनेक पात्र मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा आरोप करत, पात्र मतदारांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवणे हा लोकशाही प्रक्रियेवरील आघात असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार तसेच निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांच्यात मागील दहा महिन्यांच्या कालावधीत अनेक मुद्द्यांवर मतभेद झाल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. तसेच, दोन्ही निवडणूक आयुक्तांनी व्यक्त केलेल्या मतांच्या विरोधात किमान १४ वेळा निर्णय घेण्यात आल्याचा आरोपही काँग्रेसकडून करण्यात आला आहे.

मुख्य निवडणूक आयुक्तांकडून निवडणूक आयोगाचा कारभार एकतर्फी पद्धतीने होत असून, भारतीय जनता पक्षाला राजकीय फायदा मिळवून देण्याच्या उद्देशाने निर्णय घेतले जात असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या सर्व आरोपांची स्वतंत्र चौकशी व वस्तुनिष्ठ पडताळणी करण्याची मागणी आंदोलनाद्वारे करण्यात आला आहे.

**मतदार यादीच्या फेरबदलाची स्वतंत्र समीक्षा**

ज्ञानेश कुमार यांना पदावरून तातडीने दूर करावे, त्यांच्या कार्यकाळात मतदार यादीत झालेल्या फेरबदलांची स्वतंत्रपणे समीक्षा करावी आणि या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशा विविध मागण्या काँग्रेसकडून करण्यात येणार आहेत.

महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला अभिवादन करून सत्याग्रह आंदोलनाला सुरुवात करण्यात आला असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला



अभिवादन करून आंदोलनाची सांगता करण्यात आला आहे. काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होते .

या सत्याग्रह आंदोलनात खासदार डॉ. प्रशांत पडोळे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा माजी आमदार गोपालदास अग्रवाल, यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील वरिष्ठ काँग्रेस नेते, जिल्हा परिषद व नगर परिषदांचे पदाधिकारी, जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते असल्याचे काँग्रेसने सांगितले. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अमर वराडे यांनी जिल्ह्यातील सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सत्याग्रह आंदोलनात सहभागी झाले. या मोर्चात खासदार प्रशांत पडोळे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अमर वराडे, माजी आमदार गोपालदास अग्रवाल, नगराध्यक्ष सचिन शेंडे, छोटू बिसेन, विजय फुंडे, नगर पंचायत उपाध्यक्ष मलेशाम येरोला, ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र कटरे यांच्यासह काँग्रेसचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी सहभागी झाले होते.

## नगरधनच्या स्व.इंदिरा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या ५ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेकरिता निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक :** रामटेक तालुक्यातील श्रीमती इंदिरा शिक्षण संस्था,नगरधन द्वारा संचालित स्व.इंदिरा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,नगरधन येथील ५ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेकरिता निवड झाली आहे. या देदीप्यमान यशामुळे शाळेच्या व परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. २७ व २८ सप्टेंबर २०२६ रोजी भंडारा येथे आयोजित विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत या



विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक असा कुस्तीचा डाव रंगविला. यात १४ वर्षे वयोगट अंतर्गत इयत्ता ८ वी तील विद्यार्थी वंश चंद्रशेखर मेश्राम (वजन ६८ किलो), तर १७ वर्षे वयोगट अंतर्गत इयत्ता ११ वी तील विद्यार्थिनी कु.राणी रामदास निकुडे (वजन ४३ किलो)यांनी बाजी मारली. फ्री स्टाईल मध्ये इयत्ता ११ वी तील विद्यार्थी प्रिन्स राजकुमार दमाहे (वजन ४५ किलो) व इयत्ता ९ वी तील विद्यार्थी श्रेयस क्रिष्णा पाटील (वजन ६० किलो) यांनी सर्वोत्तम खेळ केला..तर ग्रिको रोमन मध्ये ४५ किलो वजनगटात इयत्ता १० वी चा विद्यार्थी कुणाल राजहंस माहुले याने जोरदार डाव मारत प्रतिस्पर्धी कुस्तीगीराला क्षणातच लोळविले.वंश मेश्राम,राणी निकुडे,प्रिन्स दमाहे,श्रेयस पाटील व कुणाल माहुले या पाचही विद्यार्थ्यांनी विभागीय कुस्ती स्पर्धेत जोरदार प्रदर्शन करत राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत आपले स्थान पक्के केले. पाचही विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन व मिठाई भरवून शाळेच्या मुख्याध्यापिका निशा राजेश बाकडे यांच्या अध्यक्षतेखाली व सर्व शिक्षक-शिक्षिका,कर्मचारी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम घेऊन शाळेतर्फे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या यशात त्यांचे कुस्ती प्रशिक्षक उमरावजी मेश्राम तालीम संघ नगरधन येथील कुस्ती प्रशिक्षक ईश्वर मेश्राम व निलेश दमाहे तसेच न्यू पवनसूत तालीम संघ चिचाळा येथील कुस्ती प्रशिक्षक राजहंस माहुले, संजय मोहारे व मिताराम दमाहे यांचे मोलाचे योगदान आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेतही हे पाचही विद्यार्थी उत्कृष्ट प्रदर्शन करून विजयी ठरतील असा विश्वास शाळेच्या मुख्याध्यापिका निशा राजेश बाकडे यांनी व्यक्त करून कुस्तीगीरांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. रामटेक परिसरात या कुस्तीगीर विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## बल्लारपुरात शेकडो नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी : रोग निदान व उपचार शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर :-(धनंजय पांढरे)**

नगर परिषद बल्लारपूरच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या सेवा संकल्प अभियान अंतर्गत महिला व बालकल्याण समिती आणि आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे), वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी २९ सप्टेंबर रोजी गांधी विद्यालय, बल्लारपूर येथे भव्य मोफत रोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून शेकडो नागरिकांची नोंदणी करून विविध आजारांची तपासणी व उपचार करण्यात आले. सावंगी (मेघे) रुग्णालयाचे संचालक डॉ. अभिषेक जोशी आणि प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रिया गोडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बल्लारपूरचे आरोग्य अधिकारी डॉ. डांगे तसेच ग्रामीण रुग्णालय बल्लारपूरच्या आरोग्य पथकानेही शिबिरात आरोग्यसेवा दिली. सावंगी रुग्णालयातील विविध विभागांचे तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी नागरिकांची तपासणी करून आवश्यक औषधोपचार केले.

शिबिरात नेत्ररोग, अस्थिरोग, मेडिसिन, शस्त्रक्रिया, बालरोग, स्त्रीरोग, त्वचारोग, श्वसनरोग, कान-नाक-घसा तसेच मुखरोग अशा विविध विभागांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी केली. रक्तदाब, रक्तातील साखर, हृदयरोग, किडनीचे आजार, अशक्तपणा, चक्कर येणे, छातीत दुखणे, धाप लागणे यांसह हाडांचे विकार, संधिवात, मोतिबिंदू, त्वचारोग, दमा, दीर्घकाळचा खोकला, कान-घशाचे विकार, दातांचे आजार आदींची तपासणी करण्यात आली. महिलांसाठी मासिक पाळीशी संबंधित समस्या, गर्भाशयावरील गाठी, गर्भाशयाचे आजार आदींची तपासणी करण्यात आली. बालरोग विभागामार्फत कुपोषणासह लहान मुलांच्या विविध आजारांची तपासणी करण्यात आली. तसेच हर्निया, हायड्रोसिल, अंगावरील गाठी, मुतखडा, पोटाचे आजार आदी समस्यांवरही तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व उपचार करण्यात आले. या आरोग्य शिबिराचा लाभ बल्लारपूर शहरातील नागरिकांसह बचत गटातील महिला, सफाई कर्मचारी आणि इतर नागरिकांनी मोठ्यॉ संख्येने घेतला. नागरिकांना त्यांच्या परिसरातच विविध तज्ज्ञांकडून मोफत आरोग्य तपासणी व उपचार मिळाल्याने शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी नगराध्यक्षा डॉ. अलका अनिल वाढई, मुख्याधिकारी विशाल वाघ, उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अँड. मेघा भाले, उपसभापती शिल्पा चुटे तसेच नगर परिषद प्रशासनाने विशेष परिश्रम घेतले. नगर परिषद प्रशासन, आरोग्य विभाग आणि सावंगी (मेघे) रुग्णालयाच्या संयुक्त प्रयत्नातून नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेले हे आरोग्य शिबिर यशस्वी ठरले.

# ज्येष्ठ नागरिकांची कोटेश्वर-खडकी तीर्थक्षेत्र दर्शन सहल उत्साहात संपन्न

### ३५ सभासदांचा सहभाग; धार्मिक दर्शनासोबत स्नेहबंधही झाले वृद्धिंगत

**दै. सिंहवाणी वृत्त,नागपूर**

ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान, नागपूर व अमर नगर ज्येष्ठ नागरिक मंडळ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी २७ सप्टेंबर रोजी, कोटेश्वर व खडकी या तीर्थक्षेत्रांची दर्शन सहल आयोजित करण्यात आली. या सहलीत ३५ सभासदांनी उत्स्फूर्त सहभाग घेत धार्मिक व आध्यात्मिक वातावरणाचा आनंद घेतला.



सहली दरम्यान ज्येष्ठ नागरिकांनी खडकी येथील श्री हनुमान मंदिरात दर्शन घेऊन प्रार्थना केली. त्यानंतर कोटेश्वर येथे जाऊन श्री कोटेश्वराचे दर्शन घेतले. धार्मिक स्थळांच्या भेटीमुळे ज्येष्ठ नागरिकांना आध्यात्मिक समाधान व प्रसन्नतेचा अनुभव मिळाला. ही सहल ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे सचिव राजूजी मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अमर नगर ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष देविदासजी आगरकर यांच्या विशेष प्रयत्नातून आयोजित करण्यात आली. सहल यशस्वी करण्यासाठी मंडळाचे सचिव वसंतराव इझनकर, उपाध्यक्ष गणपतराव निंबाळकर, शोभा आगरकर, सौ. निंबाळकर व सौ. रासेकर यांनी परिश्रम घेतले. सहलीत गोजे, बावनकर, अरमरकर, वाकोडीकर, सिंगरू, मस्के, बागडे, खोडे, शिंदे, मुंगळे, धनजोडे, जयस्वाल, चौधरी यांच्यासह अन्य सभासदांनी सहभाग घेतला.

तीर्थक्षेत्रांच्या दर्शनाबरोबरच या सहलीमुळे ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवनातील धावपळीपासून काही काळ दूर राहून परस्परांशी संवाद साधण्याची, जुन्या आठवणींना उजाळा देण्याची आणि आपुलकीचे संबंध अधिक दृढ करण्याची संधी मिळाली. सहलीदरम्यान निर्माण झालेले आनंदाचे व उत्साहाचे वातावरण सर्वांसाठी संस्मरणीय ठरले. ज्येष्ठ नागरिकांच्या शारीरिक व मानसिक प्रसन्नतेसोबतच सामाजिक आणि आध्यात्मिक जडणघडणीसाठी अशा सहली उपयुक्त ठरतात. त्यामुळे भविष्यातही ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध धार्मिक, ऐतिहासिक व पर्यटनस्थळांच्या सहली वारंवार आयोजित कराव्यात, अशी अपेक्षा सहभागी ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली.

# नवरात्रीत होणार 'जागर आरोग्याचा'

### 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद' उपक्रमातून वैद्यकीय तज्ज्ञ साधणार तरुणाईशी थेट संवाद

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

नवरात्रोत्सवात राज्यातील महाविद्यालयीन तरुणाईच्या आरोग्याचा जागर केला जाणार आहे. वाढता स्क्रीन टाइम, अपुरी झोप, चुकीच्या आहाराच्या सवयी, व्यायामाचा अभाव आणि मानसिक ताण यामुळे तरुणांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. या पार्श्वभूमीवर आजार टाळण्यासाठी तरुण वयापासूनच आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जागृती व्हावी, यासाठी राज्यात प्रथमच 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद' हा नऊ दिवसांचा विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमातून राज्यातील विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक व वैद्यकीय तज्ज्ञ राज्यभरातील विद्यार्थ्यांशी थेट आरोग्यविषयक संवाद साधणार आहेत.

**विद्यार्थ्यांशी थेट संवाद**

राज्यातील वैद्यकीय, कृषी, अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य, कला आणि इतर विद्याशाखांतील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होतील. प्रत्येक जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, विभागप्रमुख आणि वैद्यकीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. तरुण वयात आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यास त्याचे परिणाम पुढील आयुष्यात जाणवू शकतात. त्यामुळे आजार झाल्यानंतर उपचार घेण्याबरोबरच आजार टाळण्यासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, मानसिक आरोग्याची काळजी, व्यसनांपासून दूर राहणे आणि वेळेवर आरोग्य तपासणी यांचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आरोग्याबाबत जागृत राहण्याबरोबरच ही माहिती कुटुंब, मित्र आणि समाजापर्यंत पोहोचवावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

**संवादाचे विषय :**

- बदलती जीवनशैली आणि तरुणांचे आरोग्य
- संतुलित आहार आणि बदललेल्या आहाराच्या सवयी
- व्यायाम आणि शारीरिक तंदुरुस्ती
- मानसिक आरोग्य
- मोबाईल, सोशल मीडिया आणि वाढता स्क्रीन टाइम
- व्यसनांपासून दूर राहणे
- निरोगी जीवनशैली आणि आरोग्यदायी समाजनिर्मिती

'मुख्यमंत्री आरोग्य संवाद' हा उपक्रम राज्यातील तरुणाईशी थेट संवाद साधणारा हा पहिलाच उपक्रम आहे. सध्याच्या बदलत्या जीवनशैलीत तरुणांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांवर त्यांच्याशी थेट संवाद साधणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना या संवादातून आरोग्याशी संबंधित प्रश्न मोकळेपणाने मांडता येणार आहेत. तज्ज्ञांकडून मिळणारी माहिती आरोग्यदायी जीवनशैली करिता विद्यार्थ्यांना उपयोगी ठरणार असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी म्हटले आहे.

थोडक्यात

## ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबिर, आज सामाजिक न्याय भवनात आयोजन

### डिजिटल साक्षरतेसह ज्येष्ठांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ज्येष्ठ नागरिकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राहावे, त्यांचे जीवन सुसह्य व्हावे तसेच समाजामध्ये त्यांना सन्मानाचे स्थान मिळावे, यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त नागपुरात १ ऑक्टोबर रोजी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विंग सी, समाज कल्याण कार्यालय, शासकीय आयटीआयसमोर, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर येथे १ ऑक्टोबरला सकाळी ११ वाजता हे शिबिर होणार आहे. ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य सुस्थितीत राहावे, या उद्देशाने आयोजित या शिबिरात विविध आरोग्य तपासण्या करण्यात येणार असून ज्येष्ठ नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच 'सेवा संकल्प अभियान'अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजिटल साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या धोरणानुसार ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी दरवर्षी १ ऑक्टोबर हा दिवस राज्यात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त सार्वजनिक पदयात्रा, प्रभात फेरी, सभा, ज्येष्ठ नागरिकांचा तसेच त्यांच्या हितासाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा सत्कार यांसारखे विविध उपक्रम आयोजित केले जातात. जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नागरिकांनी वेळेवर उपस्थित राहून आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

## विद्यासागर कला महाविद्यालयात रावबहादूर डी. लक्ष्मी नारायण दिवस उत्साहात साजरा

### रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श : डॉ. गिरीश सपाटे



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (बिजेवाडा) रामटेक येथे रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण डे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. गिरीश सपाटे यांनी रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्या सामाजिक दातृत्वाचा आणि शैक्षणिक योगदानाचा आढावा घेतला. दान हे केवळ वैयक्तिक उदारतेचे प्रतीक न राहता मानवकल्याणाचे प्रभावी माध्यम ठरले पाहिजे, अशी भूमिका रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांनी आपल्या कायार्तून अधोरेखित केली. शिक्षण सर्वदूर पोहोचावे, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि समाजाच्या विकासाला चालना मिळावी, या व्यापक दृष्टिकोनातून त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या मालमत्तेचे केलेले दान हे अभूतपूर्व व अद्वितीय असल्याचे डॉ. गिरीश सपाटे यांनी सांगितले. यावेळी डॉ. सावन धर्मपुरीवार यांनी समाजातील दान आणि दातृत्वाविषयी रूढ असलेल्या चुकीच्या संकल्पनांवर भाष्य केले. रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्या जीवनातून निःस्वार्थ दातृत्व आणि सामाजिक बांधिलकी शिकण्यासारखी असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुवर यांनी रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्या संघर्षमय जीवनाचा वेध घेतला. खान कामगार म्हणून जीवनाची सुरुवात करून खानमालक होईपर्यंत त्यांनी केलेला संघर्ष, त्यातून निर्माण झालेली आर्थिक क्षमता आणि ती क्षमता स्वतःपुरती मर्यादित न ठेवता समाजहितासाठी वापरण्याची त्यांची मानसिकता यांचे त्यांनी प्रभावी शब्दांत विवेचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. रवींद्र पानतावणे यांनी केले, तर आभार डॉ. विलास जायभाये यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. ज्योती कवठे, प्रा. गंगा मोंढे, प्रा. रणजित वायसे, कु. कीर्ती जयस्वाल, ज्ञानेश्वर हटवार, विनोद परतेती, ललित कनोजे आणि रफीक कुरेशी यांनी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्या सामाजिक दातृत्वाचा आणि शिक्षणविषयक दृष्टिकोनाचा परिचय विद्यार्थ्यांना करून देणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.

## पूर्व विदर्भातील उर्वरित तालुके दुष्काळी घोषित करा!

### शिवसेना ओबीसी विभागाचे पूर्व विदर्भ अध्यक्ष प्रवीण डी.कळंबे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पूर्व विदर्भातील दुष्काळग्रस्त परिस्थितीची तातडीने दखल घेऊन अद्याप दुष्काळी तालुके म्हणून घोषित न झालेल्या उर्वरित तालुक्यांची पाहणी करून त्यांनाही दुष्काळी तालुके म्हणून घोषित करावे, अशी मागणी



शिवसेना ओबीसी विभागाचे पूर्व विदर्भ अध्यक्ष प्रवीण डी. कळंबे यांनी केली आहे. यासंदर्भात कळंबे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तसेच राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या माध्यमातून हे निवेदन शासनाकडे पाठविण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, पूर्व विदर्भातील सर्व जिल्हे दुष्काळग्रस्त परिस्थितीचा सामना करीत आहेत. यापूर्वी शासनाने काही तालुक्यांचा दुष्काळी परिस्थितीत समावेश केला असला, तरी त्यातून वगळण्यात आलेल्या तालुक्यांमध्येही शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने केवळ घोषित तालुक्यांपुरते मर्यादित न राहता परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक आहे. विशेषतः गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि वर्धा जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून उर्वरित तालुक्यांचाही दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश करावा, अशी मागणी केली आहे.

थोडक्यात

## 'मौनाच्या पारावर' काव्यसंग्रहाचे उद्या प्रकाशन

### डॉ. उपेंद्र कोठेकर यांच्या निवडक कवितांचा संग्रह

दै.सिंहवाणी वृत्त, नागपूर



राजकारण आणि समाजकारणाच्या क्षेत्रात सक्रिय असतानाही आपल्या मनातील काव्यभावना जपत लेखन करणारे भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष डॉ. उपेंद्र मा. कोठेकर यांच्या निवडक कवितांचा संग्रह 'मौनाच्या पारावर' चा प्रकाशन समारंभ शुक्रवार, २ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. लेखक, वक्ता व समीक्षक डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी या कवितासंग्रहाचे संपादन केले आहे. सायंकाळी ५ वाजता हॉटेल अशोका, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर, नागपूर येथे होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय प्रचार प्रमुख प्रमोद बापट राहतील. डॉ. राजेंद्र नाईकवाडे या काव्यसंग्रहावर भाष्य करतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभा साठे करणार आहेत. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लाखे प्रकाशनद्वारे करण्यात आले आहे.

## विदर्भ साहित्य संघातर्फे 'विदर्भस्तरीय खुली एकांकिका स्पर्धा'

### १ ऑक्टोबरपासून प्रवेशिका स्वीकारणार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भातील रंगकर्मी आणि नाट्यसंस्थांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने विदर्भ साहित्य संघातर्फे यंदापासून विदर्भस्तरीय खुल्या



एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. यंदा अकोल्याचे दिवंगत रंगकर्मी कै. राम जाधव यांच्या स्मृतिला ही स्पर्धा समर्पित करण्यात आली आहे. यापूर्वी विदर्भ साहित्य संघातर्फे कै. पद्माकर डवरे एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले जात असे. अतिशय प्रतिष्ठेच्या मानल्या गेलेल्या या स्पर्धेतून अनेक रंगकर्मी घडले आणि वैदर्भीय रंगभूमीला मोठे योगदान मिळाले होते. त्याच धर्तीवर स्पर्धा नव्या स्वरूपात पुन्हा एकदा सुरू करण्याचा निर्णय विदर्भ साहित्य संघाच्या नव्या कार्यकारिणीने घेतला आहे. या स्पर्धेसाठी प्रवेश निःशुल्क असून प्रवेशिका प्रवेशिका १ ऑक्टोबरपासून गुगल फॉर्मद्वारे ऑनलाइन स्वीकारण्यात येणार आहेत. लिंक आहे - https://forms.gle/LDK9wszxHoGyNXpeA. २४ ऑक्टोबर ही प्रवेशिका सादर करण्याची अंतिम तारीख आहे. लेखकाचे अनुमतीपत्र व एकांकिकेचे डीआरएम प्रमाणपत्र सोबत जोडणे अनिवार्य आहे.

या स्पर्धेची प्राथमिक फेरी १ ते ४ नोव्हेंबर २०२६ दरम्यान स्थानिक ब्लॅक बॉक्स, कस्तुरबा भवन, बजाजनगर येथे होईल. ५ नोव्हेंबर रोजी मराठी रंगभूमी दिनानिमित्त अंतिम फेरी रंगमंडप, कस्तुरबा भवन, बजाजनगर आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक संघाला सादरीकरणासाठी कमाल एक तासाचा वेळ देण्यात येईल. त्यात पूर्वतयारीसाठी २० मिनिटांच्या वेळेचा समावेश असेल. विजेत्या संघाला प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह, द्वितीय क्रमांकासाठी १५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह, तर तृतीय क्रमांकासाठी १० हजार रुपये व स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे. सहभागी इतर सर्व संघांना विदर्भ साहित्य संघाचे स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात येईल. अधिक माहितीसाठी संयोजक डॉ. पराग घोंगे यांचेशी ७७४३९७३५८२ या किंवा ९८९०२५४१९८ क्रमांकांवर संपर्क साधावा. विदर्भातील अधिकाधिक नाट्यसंस्था, रंगकर्मी आणि एकांकिका सादर करणाऱ्या संघांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## 'द नॅरेटिव्ह नूक' आंतरशालेय कथाकथन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

आर. एस. मुंडले इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज (प्राथमिक विभाग), समर्थ नगर, नागपूर येथे आयोजित 'द नॅरेटिव्ह नूक' या आंतरशालेय कथाकथन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नागपूर शहरातील १८ नामांकित शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. मिलेनियम किड्सच्या मुख्याध्यापिका व संचालिका श्रीमती मिथिला पितळे या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या तसेच परीक्षक म्हणून उपस्थित होत्या. तिसऱ्या वर्गासाठी 'चांगल्या कर्मांचे प्रतिबिंब दाखवणारा आरसा' या विषयावर घेण्यात आलेल्या स्पर्धेत स्मिरल गायकवाड (S.O.S. अत्रे लेआउट), सानिध्या ठाकरे (बिपिन कृष्ण बोस विद्या विहार), आराध्य खांडेश्वर (बी.आर. मुंडले इंग्लिश स्कूल), कनक पांडे (भारती कृष्ण विद्या विहार) यांनी पुरस्कार पटकावले. तर चौथ्या वर्गासाठी घेण्यात आलेल्या 'गुरूच्या सावलीत' या विषयावरील स्पर्धेत अन्वय खोडके (B.V.M.), गरिमा हिंगवे (सरस्वती विद्यालय), आद्या खटी (B.K.V.V.), मीरा मुडे (सोमलवार स्कूल) यांनी पुरस्कार पटकावले.

मिथिला पितळे यांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक गोष्टींची पुस्तके वाचण्यास आणि दररोज आपल्या ज्ञानात भर घालण्यास प्रोत्साहित केले. हा कार्यक्रम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका प्रांजली कुरळकर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लखबीर सुरी, पर्यवेक्षिका अमृता नगरकर आणि स्पर्धा प्रमुख प्रतिभा मालवार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला.

# 'थलाई कुथल'चा सुवर्णमयी धमाका, तर 'चिंधी बाजार' उपविजेता!

## नागपुरात महावितरणचा नाट्यकुंभ जल्लोषात संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

रंगमंचावरील कलागुणांचा अद्भुत आविष्कार, कलाकारांचा सळसळता उत्साह आणि प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद अशा अत्यंत भारावून टाकणाऱ्या वातावरणात महावितरणच्या नागपूर प्रादेशिक आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धा २०२६ चा सोहळा पार पडला. या दोन दिवसीय नाट्योत्सवात नागपूर परिमंडळाच्या 'थलाई कुथल' या नाटकाने आपल्या उत्कृष्ट अभिनयाने आणि प्रभावी सादरीकरणाने रसिकांची मनं जिंकत सर्वोत्कृष्ट नाटकाचा बहुमान मिळविला. तर, अकोला परिमंडळाच्या 'चिंधी बाजार' या नाटकाने उपविजेतेपदाचा बहुमान मिळवला.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण महावितरणचे संचालक (संचलन) धनंजय ओंढेकर आणि कार्यकारी संचालक (नियोजन व ई-वाहन चार्जिंग स्टेशन्स) प्रसाद रेशमे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सोहळ्याला नागपूर परिक्षेत्राचे प्रभारी प्रादेशिक संचालक तथा नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, मुख्य अभियंता सर्वश्री दिलीप दोडके, दत्तात्रय बनसोडे आणि हरिश गजबे यांच्यासह स्पर्धेचे परीक्षक प्रसिद्ध रंगकर्मी महेश पातुरकर, विवेक खेर आणि मिनाक्षी बोरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी बोलताना संचालक धनंजय ओंढेकर यांनी, स्पर्धेत जय-पराजय होतच असतो, ज्यांना यश मिळाले नाही त्यांनी निराश न होता पुढील वर्षी अधिक नव्या उर्जेने उतरावे, या मंचावरून घडणारे कलाकार उद्या संपूर्ण महाराष्ट्रात महावितरणचे नाव उज्वल करतील अशा शुभेच्छा दिल्या. कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे म्हणाले की, कलेचे सादरीकरण करताना कलाकाराने अनुभवलेला आनंद आणि रसिकांच्या चेहऱ्यावर फुलवलेले हास्य हेच कोणत्याही कलाकाराचे खरे आणि सर्वात मोठे पारितोषिक असते. आयोजक व प्रभारी प्रादेशिक संचालक राजेश नाईक यांनी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी केवळ विजेचीच नाही तर आपल्या अभिनयाचीही रोषणाई मंचावर पसरवली असून सादर झालेल्या प्रत्येक नाटकाने समाजाला एक सुंदर आणि सकारात्मक संदेश दिल्याचा आनंद व्यक्त केला. तसेच ज्येष्ठ रंगकर्मी व परीक्षक विवेक खेर यांनी आपल्याच कर्मचाऱ्यांमधील कलागुणांना वाव देऊन कुटुंबासारखे जपणाऱ्या महावितरण परिवाराचे कौतुक केले.

या दोन दिवसांच्या नाट्योत्सवात प्रेक्षकांना एकाहून एक सरस, आशयघन आणि दजेदार नाटकांची अनुभूती घेता आली. यामध्ये अकोला परिमंडळातर्फे 'चिंधी बाजार', अमरावती परिमंडळातर्फे 'गुलाम', नागपूर परिमंडळातर्फे 'थलाई कुथल' आणि चंद्रपूर परिमंडळातर्फे 'एक होती राणी' या नाटकांचे प्रयोग रंगले. या सोहळ्यासाठी नागपूर, अकोला, अमरावती, चंद्रपूर आणि गोंदिया या सर्व परिमंडलांतून आलेले वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि नाट्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महावितरणच्या नागपूर प्रादेशिक आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धा २०२६ च्या अंतिम निकालात नागपूर परिमंडळाच्या 'थलाई कुटल' या नाटकाने सर्वोत्तम नाटकाचा प्रथम पुरस्कार पटकावला, तर अकोला परिमंडळाच्या 'चिंधी बाजार' नाटकाने द्वितीय क्रमांक मिळवला. दिग्दर्शन क्षेत्रात 'थलाई कुटल' नाटकासाठी प्रफुल लांडे यांनी प्रथम, तर 'चिंधी बाजार' नाटकासाठी संजय पुरकर यांनी द्वितीय पारितोषिक जिंकले. उत्कृष्ट पुरुष अभिनयासाठी 'थलाई कुटल' मधील भूमिकेसाठी प्रशांत मडावी यांना प्रथम आणि 'चिंधी बाजार' मधील भूमिकेसाठी रोशन समदुरे यांना द्वितीय पुरस्कार मिळाला. उत्कृष्ट स्त्री अभिनयात 'चिंधी बाजार' मधील भूमिकेसाठी सुप्रिया घुटके प्रथम, तर 'एक होती राणी' मधील भूमिकेसाठी रोहिणी ठाकरे द्वितीय ठरल्या. नेपथ्यासाठी 'गुलाम'चे सुधीर खुजनारे प्रथम तर 'एक होती राणी'चे रमेश सानप द्वितीय राहिले. प्रकाश योजनेत 'थलाई कुटल'चे जयंत बाणेरकर प्रथम व 'चिंधी बाजार'चे अजितपाल सिंह दिनोरे द्वितीय ठरले. पार्श्वसंगीतासाठी 'थलाई कुटल'च्या अमित पेढेकर यांनी प्रथम तर 'एक होती राणी'च्या असित ढाकणेकर आणि डॉ. अविनाश आचार्य यांनी द्वितीय पारितोषिक मिळवले.

रंगभूषा-वेशभूषा विभागात 'थलाई कुटल'च्या अनुश्री पांडे आणि स्वाती फाटे यांनी प्रथम तर 'एक होती राणी'च्या प्रविण बिसेन आणि अरविंद कातकर यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. याशिवाय उषा धोटे ('चिंधी बाजार'), वैभव इंगळे ('गुलाम'), असित रामटेके ('थलाई कुटल') आणि भाविन नांढा ('एक होती राणी') यांना उत्तेजनार्थ पारितोषिकाने, तर बाल कलाकार अमय मोरे ('चिंधी बाजार') आणि जीतु सिंह ('एक होती राणी') यांना विशेष उत्तेजनार्थ पारितोषिकाने गौरविण्यात आले.

## कुणाल ढाब्याजवळ बस-दुचाकीची भीषण धडक, युवक गंभीर जखमी

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर




पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत येणाऱ्या कुणाल ढाब्याजवळ दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री अंदाजे ९.३० वाजताच्या सुमारास बस आणि दुचाकीची धडक होऊन एक युवक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, बस क्रमांक MH-49-BZ-4054 ही नागपूरकडून सावनेरच्या दिशेने जात असताना समोरून येणाऱ्या दुचाकी क्रमांक MH-40-DB-6776 ला धडक झाली. या अपघातात दुचाकीस्वार नेहाल कमाले (वय ३० वर्षे, रा. सावनेर) गंभीर जखमी झाले.

घटनेची माहिती सावनेर नगर पालीकेचे उपाध्यक्ष राजू घुगल यांनी सामाजिक कार्यकर्ते तथा मृत्युंजय दूत हितेश बनसोड यांना दिली. माहिती मिळताच हितज्योती आधार फाउंडेशनची टीम तात्काळ घटनास्थळी रवाना झाली आणि जखमी नेहाल कमाले यांना मदत करून पुढील उपचारासाठी सावनेर शासकीय रुग्णालयात दाखल केले. सावनेर शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर जखमीची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथे रेफर करण्यात आले. अपघातात त्यांच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाल्याची माहिती आहे. अपघाताची माहिती मिळताच हितज्योती आधार फाउंडेशनच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमीला वेळेत वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी मदत केली. अपघाताच्या घटनेचा पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहेत.

## चित्रकला स्पर्धेतील विजेत्या बालप्रतिभांना बक्षिसांचे वितरण



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाच्या बालकला अकादमीतर्फे आयोजित चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. नागपुरातील विविध शाळांमधील सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा, सोमलवार रामदास पेठ, सोमलवार निकालस, टी ब्रांच मुंडले, सेंट पॉल हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, भारतीय विद्या भवन भाऊजी दप्तरी, स्कूल ऑफ स्कॉलर्स यांसह शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

बक्षीस वितरण समारंभाला स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस, शाळेच्या मुख्याध्यापिका माया बमनोटे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुरेखा वासनिक आणि उपमुख्याध्यापक सुबोध आष्टीकर उपस्थित होते. यावेळी सहभागी शाळांच्या मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला.

स्पर्धेच्या अ गटात ब्लूमिंग किड्स श्रीमती दादीबाई हिंदू मुलींची शाळाच्या पार्थिवी तांदूळकर हिने प्रथम, सोमलवार रामदासपेठच्या वृद्धी बुरडे हिने द्वितीय, सेंट पॉल स्कूल हुडकेश्वरच्या झेनाब शेख हिने तृतीय तर भाऊजी दप्तरी हायस्कूलच्या अंशिका नागपुरकर हिने चतुर्थ क्रमांक तर सोमलवार निकालसच्या तितिक्षा चौधरी यांनी पाचवा क्रमांक मिळविला. ब गटात सोमलवार हायस्कूल रामदासपेठच्या वर्तिका भुसारी प्रथम, प्रियदर्शनी नागपूर पब्लिक स्कूलच्या मल्हार कथले द्वितीय, सेंड फॉर स्कूल हुडकेश्वरच्या अर्णव मानकर तृतीय, स्कूल ऑफ स्कॉलरच्या वैदही ठोंबरे चतुर्थ आणि टी ब्रांच मुंडले इंग्लिश मीडियम स्कूलच्या ईशान्वी देशपांडे पाचव्या क्रमांकावर राहिली.

क गटात सेंड फॉर स्कूलच्या श्रीयश पाल याने प्रथम, टी ब्रांच मुंडले इंग्लिश मीडियम स्कूलच्या संस्कृती भिवगडे हिने द्वितीय, सोमलवार निकालसच्या परिसा रंगारी हिने तृतीय, दिल्ली पब्लिक स्कूल लावाच्या अद्वैत लाखे याने चतुर्थ आणि सोमलवार हायस्कूल रामदासपेठच्या तनिष्का जामगडे हिने पाचवा क्रमांक मिळविला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन उर्वशी डावरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कोमल चौधरी आणि समीक्षा लाखे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## बाजार समितीच्या सर्वसमावेशक विकासासाठी कटिबद्ध : सभापती सचिन किरपान यांची ग्वाही, वार्षिक आमसभा व शेतकरी मार्गदर्शन मेळावा संपन्न!

### लकी ड्रॉ योजनेतील विजेत्यांना बक्षीस वितरण; सरपंच, संस्थांचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव; शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांची विक्रमी उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक




कृषी उत्पन्न बाजार समिती, रामटेकची सन २०२५-२६ ची वार्षिक सर्वसाधारण सभा व शेतकरी मार्गदर्शन-प्रशिक्षण मेळावा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील गंगा भवनम् सभागृहात दि.२८ सप्टेंबर रोजी प्रचंड उत्साहात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सभेच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे सभापती सचिन किरपान हे होते.

यावेळी बाजार समितीच्या उपसभापती लक्ष्मी कुमरे, तालुका कृषी अधिकारी सुनील कोरटे, नंदकिशोर जयस्वाल कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापक विकास किरणापुरे, कृउबासचे सर्व संचालक, आडते, व्यापारी, हमाल, बाजार समितीचे कर्मचारी, विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच व सदस्य तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे अध्यक्ष व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्येष्ठ संचालक त्रिलोक मेहर यांनी प्रास्ताविक भाषण केले. त्यांनी बाजार समितीच्या कार्यपद्धतीची, गेल्या काही वर्षांत झालेल्या पायाभूत सुविधांच्या विकासाची आणि शेतकरी हिताच्या योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर बाजार समितीचे सचिव हनुमंत महाजन यांनी वार्षिक कामकाजाचा सविस्तर अहवाल सभागृहासमोर सादर केला.

याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी सुनील कोरटे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या विविध कल्याणकारी व अनुदानाच्या योजनांची सविस्तर माहिती देत आधुनिक शेतीकडे वळण्याचे आवाहन केले. गेल्या वर्षभरात विविध गटांत यशस्वीपणे राबविण्यात आलेल्या 'लकी ड्रॉ' योजनेच्या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक पारितोषिके वितरित करण्यात आली, तसेच सहभागी शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

आमसभेच्या निमित्ताने उपस्थित विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच तसेच सेवा सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचा उपरणे व छत्रपती शिवाजी महाराज यांचे तैलचित्र देवून यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सेवा सहकारी संस्था मांद्रीचे अध्यक्ष रामकृष्ण नवघरे व कृउबासचे संचालक योगेश म्हात्रे यांनी समयोचित भाषणे करून बाजार समितीच्या प्रगतीचे कौतुक केले. उत्कृष्ट कार्याबद्दल कृउबासचे सचिव हनुमंत महाजन व सर्व कर्मचाऱ्यांचाही या वेळी विशेष सत्कार करण्यात आला.

**"समितीच्या सर्वमुखी विकासासाठी कटिबद्ध"**

अध्यक्षीय भाषणात सभापती सचिन किरपान यांनी बाजार समितीच्या प्रगतीचा आलेख मांडला. ते म्हणाले की, "बाजार समिती आज आर्थिक स्थैर्याकडे वाटचाल करत असून लाखांवरून कोट्यवधींच्या उत्पन्नाचा टप्पा गाठण्यात सर्व संचालक, शेतकरी, व्यापारी, अडते आणि कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे आहे. आगामी काळातही शेतमालाला योग्य भाव, सुरक्षित साठवणूक आणि आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत बाजार समितीचा सर्वमुखी विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." बाजार समितीला सहकार्य करणाऱ्या सर्व घटकांचे त्यांनी यावेळी मनापासून आभार मानले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व शेतकरी व पाहुण्यांना बाजार समितीतर्फे भेटवस्तू देण्यात आल्या. स्नेहभोजनानंतर या भव्य वार्षिक आमसभेची उत्साहात सांगता झाली.आभार प्रदर्शन संचालक विरेश आष्टनकर यांनी केले.

थोडक्यात

## 'संघ साहित्य' वरील राष्ट्रीय परिषदेच्या तयारीला वेग, कार्यालयाचे उद्घाटन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीच्या वतीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'संघ साहित्य–समग्र चिंतन प्रवाह, काव्य धारा–राष्ट्र साधना के सौ वर्ष' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या तयारीसाठी १२२, डिजी सेवॅक्स, शिवाजीनगर येथे कार्यालय सुरू करण्यात आले असून या कार्यालयाचे उद्घाटन बुधवारी स्वागत समिती अध्यक्ष जयंतराव खळतकर यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी मार्गदर्शक मंडळातील सदस्य डॉ. उपेंद्र कोठेकर, स्वागत समिती सचिव डॉ. मुरलीधर चांदेकर, संघटन मंत्री, महाराष्ट्र प्रदेश नितीन केळकर, विदर्भ प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत लाखे, कार्याध्यक्ष डॉ. चंद्रशेखर भुसारी, महामंत्री विनय माहुरकर, जगदीश थपलियाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. वनामती सभागृहात होणाऱ्या या परिषदेत संघ साहित्यावरील चर्चासत्र, साहित्यिक परस्पर संवाद तसेच अखिल भारतीय कविसंमेलन आदी विविध कार्यक्रमांचा समावेश राहणार आहे. साहित्य भारतीच्या विदर्भ प्रांतातील सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, सभासद आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

## माजी नगरसेविका हीना पटेल यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



नागपूरच्या माजी नगरसेविका श्रीमती हीना गुणवंत पटेल यांचे बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६८ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पती गुणवंत पटेल, मुली लिशा व नेहा आणि मुलगा सुहास पटेल असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा गुरुवार, १ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता एम्प्रेस सिटी, बी विंग, रामन सायन्स सेंटरजवळील निवासस्थानाहून मोक्षधाम येथे निघेल. तेथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

## खंडाळा येथे स्व नागोरावजी मुरेकर यांचा ३५ वा पुण्यस्मरण सोहळा साजरा

### वारकरी मंडळीची उपस्थिती व सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल / कोंढाळी**

खंडाळा ग्राम येथे ह भ प वैकुंठवासी श्री नागोरावजी महाराज मुरेकर यांचा ३५ वा पुण्यतिथी महोत्सव सोहळा शेकडो वारकरीचे उपस्थित आनंदात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजक ह भ प धमाचार्य माऊली महाराज मुरेकर होते. कार्यक्रमाकरिता प्रमुख उपस्थिती ह भ प शिवचरित्रकार किशोर जी महाराज ठाकरे आळंदीकर, धमाचार्य भागवताचार्य भूषण जी महाराज शिंगरवाडे, भागवताचार्य रोशन महाराज कळंबे, हभप भागवताचार्य योगेश महाराज धानोरकर, सुधीर बुटे कोंढाळी, सुरेंद्र राऊत काटोल आनंदी प्रमुख्याने उपस्थित होते. कीर्तन महोत्सव मंगळवार रात्रीचे कीर्तन ह भ प भागवताचार्य परसरामजी कळंबे महाराज आणि आज बुधवारला काल्याचे किर्तन ह भ प हरिहर जी महाराज कडू यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडले. कार्यक्रमाचा खंडाळा ग्रामस्थ, बाहेगावची पाहुणे मंडळी यांनी आनंद घेतला. सर्वांकरिता महाप्रसादाची व्यवस्था आयोजकांनी केली होती.

## एसएनटीत 'दानवीर डी. लक्ष्मीनारायण कृतज्ञता दिन' साजरा




**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेक येथे राष्ट्रीय सेवा योजना कनिष्ठ व वरिष्ठ पथकाच्या वतीने 'अलौकिक दानवीर डी. लक्ष्मीनारायण कृतज्ञता दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.शिक्षण प्रसारासाठी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण करणाऱ्या या थोर दानशूराच्या स्मृतीला उजाळा देणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. दिलीप कुमार जेना प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्या प्रतिमेचे पूजन आणि माल्यार्पण करून सोहळ्याची सुरुवात झाली.

या प्रसंगी वरिष्ठ प्राध्यापक वृंद प्रा. सुनील कठाणे, डॉ. अमरीश ठाकरे, डॉ. स्वप्निल मनघे, डॉ. विवेक साहू,डॉ.गजानन रेवतकर, डॉ. इमरान कुरेशी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. शरद पोकळे यांनी अध्यक्षीय भाषणात, विद्यार्थ्यांनी दानवीरांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच खरी कृतज्ञता ठरेल, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रवाही सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष जाधव यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. किशोर धांडे यांनी मानले. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी रासेयोच्या स्वयंसेवकांनी व महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# दीपावलीत साकारणार 'खासदार शिव किल्ले स्पर्धा २०२६'

### खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे भव्य आयोजन, १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान करा नोंदणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांचा गौरवशाली इतिहास, शौर्य आणि स्थापत्यवैभव नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासोबतच सर्जनशीलतेला आणि सांस्कृतिक वारशाच्या जपणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे खासदार शिव किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दीपावलीच्या पर्वावर होणाऱ्या या स्पर्धेत पर्यावरणपूरक व पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्याचा वापर करून किल्ले साकारण्याचे आवाहन करण्यात आले आहे, अशी माहिती खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे सचिव जयप्रकाश गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या स्पर्धेसाठी शालेय व खुला असे दोन गट करण्यात आले आहेत. या दोन्ही गटासाठी शिव किल्ले आणि काल्पनिक किल्ले असे दोन विषय ठेवण्यात आले आहेत. या स्पर्धेसाठी इच्छुकांना १ ते १५ ऑक्टोबरदरम्यान नोंदणी करता येणार आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून कला, साहित्य, संस्कृती, परंपरांचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने दरवर्षी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले जाते. तसेच, गणेशोत्सव, शारदोत्सव, दुर्गोत्सवामध्ये मंडळांना विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. याच अनुषंगाने मागील वर्षी पासून किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. पहिल्याच वर्षी या स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला. त्यामुळे यावर्षी अधिक मोठ्या प्रमाणावर ही स्पर्धा घेतली जाणार आहे.

किल्ला तयार करण्याची इच्छा असलेल्या स्पर्धकांना दोन ते तीन दिवसांचे प्रशिक्षणही दिले जाणार आहे. स्पर्धकांनी तयार केलेल्या किल्ल्यांचे १२ ते १५ नोव्हेंबर दरम्यान परीक्षकांद्वारे परीक्षण केले जाईल. पर्यावरणपूरक व पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्याचा वापर करून किल्ले तयार करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

**भरघोस बक्षिसे जिंकण्याची संधी**

या स्पर्धेतील दोन्ही गटातील विजेत्यांना भरघोस बक्षिसे दिली जाणार आहेत. प्रथम क्रमांकासाठी ५१ हजार, द्वितीय ३१ हजार तर तृतीय क्रमांकासाठी २१ हजारचे बक्षिस राहील. पाच प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जाणार असून त्यांना प्रत्येकी ५ हजारची राशी दिली जाणार आहे.

या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्यावतीने करण्यात आले आहे. नावे नोंदणीकरीता व अधिक माहितीकरिता नितीन गडकरी यांचे जनसंपर्क कार्यालय, पहिला माळा, गडकरी वाडा, महाल, नागपूर येथे १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान सकाळी १२ ते ३ या वेळेत संपर्क साधावा.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजन समिती, नागपूरचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, उपाध्यक्ष डॉ. गौरीशंकर पाराशर, डॉ. दीपक खिरवडकर, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सदस्य बाळासाहेब कुलकर्णी, हाजी अब्दुल कदीर, सारंग गडकरी, अविनाश घुशे, संदीप गवई, संजय गुळकरी, रेणुका देशकर,गुड्डू त्रिवेदी, किशोर पाटील, चेतन कायरकर, आशिष वांदिले, भोलानाथ सहारे, ॲड. नितीन तेलगोटे, मनिषा काशीकर, विजय फडणवीस, महेंद्र राऊत, दिलीप गौर, शैलेश ढोबळे, संजय बंगाले, अतुल गुरू, योगेश बन, राजू कनाटे यांचे सहकार्य लाभत आहे.

पत्रकार परिषदेला जयप्रकाश गुप्ता यांच्यासह प्रा. राजेश बागडी, अतुल गुरु, संजय बंगाले, अविनाश घुशे, धनंजय डेग्वेकर, अभिजीत जाधव, जगदीश बावनकर यांची उपस्थिती होती.

**दुर्गोत्सवात होणार सांस्कृतिक कार्यक्रमांनी देवीचा जागर**

आदिमाया, आदिशक्ती दुर्गादेवीच्या उपासनेच्या दुर्गोत्सवाला लवकरच प्रारंभ होत आहे. दुर्गोत्सव मंडळांच्या तयारीला वेग आला असून यंदा दुर्गोत्सवात शहरातील विविध भागातील मंडळांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून देवीचा जागर करावा, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

यावर्षी दुर्गोत्सवात नाट्य संगीत, सुगम संगीत (भावगीत, भक्तिगीत, अभंग, देशभक्तीपर गीत, गीतरामायणावर आधारित निवडक गीते) भजन, कीर्तन, देशभक्तीपर नृत्य, गोंधळ, भारूड, नकला, एकल व समूह नृत्य, समूह वादन, कथाकथन, रांगोळी प्रशिक्षण, पारंपरिक खेळ, एकपात्री प्रयोग, कविसंमेलन (हिंदी व मराठी), लोकनृत्य, जादूचे प्रयोग, जागरण, दृकश्राव्य कार्यक्रम असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. इच्छूक मंडळांनी १ ते ७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत नावे नोंदवावी. या कार्यक्रमांच्या नोंदणीसाठी नितीन गडकरी यांचे जनसंपर्क कार्यालय, पहिला मजला, गडकरी वाडा, महाल, नागपूर येथे सकाळी १२ ते ५ या वेळात क्रमांकावर संपर्क साधावा.

**सांस्कृतिक गणेशोत्सवला लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद ५५० मंडळे, ३७४० ढोल-ताशा वादक व ८०० कलाकारांचा सहभाग**

गणेशोत्सवाच्या माध्यमातून कला, संस्कृती आणि परंपरांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्यावतीने आयोजित सांस्कृतिक गणेशोत्सवाला यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील तब्बल ५५० गणेश मंडळांनी या उपक्रमात सहभाग घेतला. त्यात ५४ ढोल-ताशा पथकांमधील तब्बल ३७४० वादकांनी पारंपरिक वादन सादर करत गणेशोत्सवाचा उत्साह द्विगुणित केला. याशिवाय सुमारे ८०० कलाकारांनी विविध कला सादर करून नागपूरकरांचे मनोरंजन केले.

यंदाच्या महोत्सवात भक्तिसंगीत, सुगम संगीत, देशभक्तिपर गीते, हास्य कविसंमेलन, जागरण, गोंधळ, कीर्तन, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, एकपात्री प्रयोग, नाट्यप्रयोग, नकला, गीत रामायण, जादूचे प्रयोग, रांगोळी व मेंदी प्रशिक्षण वर्ग, कथाकथन आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## झोपडीत झोपलेल्या ३८ वर्षीय मजुराचा मृत्यू

### शहरातील वडार मोहल्ल्यातील घटना




**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर शहरातील वडार मोहल्ला परिसरात झोपडीत झोपलेल्या एका ३८ वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची घटना आज दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ४.३० वाजताच्या दरम्यान समोर आली.

मृतकाचे नाव उमेश धनुजी मोहबे (वय ३८), रा. वडार मोहल्ला, सावनेर असे आहे. उमेश मोहबे हे हातमजुरी करून उदरनिर्वाह करत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, उमेश मोहबे हे आपल्या झोपडीत झोपले होते. आजूबाजूच्या नागरिकांनी त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला असता ते कोणतीही हालचाल करत नसल्याचे निदर्शनास आले. याबाबत स्थानिक नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना माहिती दिली. माहिती मिळताच उमेश मोहबे यांना सावनेर शासकीय रुग्णालयात आणण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

हितज्योती आधार फाऊंडेशन कडून घटनेची माहिती मिळताच सावनेर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनेची नोंद करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या घटनेमुळे वडार मोहल्ला परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## संपूर्ण गोंदिया जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करा : सुनील एम. हत्तीमारे

### केवळ तिरोड़ा तालुकाच का? काँग्रेसने उपस्थित केला सवाल

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

राज्य सरकारकडून केवळ तिरोड़ा तहसील दुष्काळग्रस्त घोषित केली जाण्याची शक्यता असताना गोंदिया जिल्ह्यातील अन्य तालुक्यांमधील शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. गोंदिया जिल्हा किसान काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनील एम. हत्तीमारे, अध्यक्ष तालुका किसान काँग्रेस कमिटी सालेकसा यांनी संपूर्ण जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्याची मागणी केली आहे. त्यांनी गोंदिया, गोरेगाव, आमगाव, सालेकसा, देवरी, अर्जुनी मोरगाव आणि सडक अर्जुनी तालुक्यांमध्ये पीक नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करण्याची मागणी केली आहे.



हत्तीमारे यांनी सांगितले की, यंदाच्या खरीप हंगामात धान पिकावर कोड किडा, मावा आणि करपा यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव झाला. शेतकऱ्यांनी तीन-चार वेळा कीटकनाशकांची फवारणी केली, मात्र अपेक्षित लाभ मिळाला नाही. ऑगस्टमध्ये जवळपास २७ दिवस ढगाळ वातावरण राहणे आणि सप्टेंबरमध्ये सततच्या पावसामुळे धानाची पिके प्रभावित झाली आहेत. उत्पादन खर्च वाढूनही पीक उत्पादन कमी होण्याची शक्यता असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

हत्तीमारे यांनी सांगितले की, सुखे व पीक नुकसानाचे आकलन सर्व तालुक्यांमध्ये समान निकषांच्या आधारे केले जावे. शासनाने शेतस्तरावर सर्वेक्षण करून वास्तविक नुकसानीचे आकलन करावे तसेच प्रभावित शेतकऱ्यांना तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी. त्यांनी संपूर्ण गोंदिया जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत देण्याची मागणी केली आहे.

## मेहनतीच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर झेप घेतलेल्या नेहा बसोनेचा गौरव

### छोट्या गावातील कन्येने ICAR परीक्षेत पटकावला ऑल इंडिया रँक ९

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील झालिया गावातील शेतकरी कुटुंबातील प्रतिभावान कन्या नेहा भारत बसोने हिने आपल्या मेहनत, जिद्द आणि दृढसंकल्पाच्या बळावर उल्लेखनीय यश संपादन करून संपूर्ण गोंदिया जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. नेहा बसोने हिने आपले प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक पाठशाळा, झालिया येथून पूर्ण केले. साधारण शेतकरी कुटुंबातून येत असतानाही तिने शिक्षणाप्रती सातत्यपूर्ण समर्पण कायम ठेवत पुढील शिक्षणातही उत्कृष्ट कामगिरी केली.



नुकत्याच झालेल्या ICAR (AIEEA-PG) परीक्षेत नेहा बसोने हिने ऑल इंडिया रँक ९ मिळवत राष्ट्रीय स्तरावर आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे कुटुंबीय, शिक्षक, गावकरी तसेच संपूर्ण गोंदिया जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे.

नेहाचे यश हे प्रतिभेला साधन-सुविधांची मर्यादा नसते, याचे प्रेरणादायी उदाहरण आहे. सातत्यपूर्ण मेहनत, आत्मविश्वास आणि ध्येयाप्रती समर्पणाच्या बळावर छोट्या गावातील कन्याही राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करू शकते, हे तिने सिद्ध केले आहे. तिचे हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विशेषतः प्रेरणादायी आहे. स्वप्ने मोठी असतील आणि मेहनत प्रामाणिक असेल, तर यशाचा मार्ग नक्कीच खुला होतो, असा प्रेरणादायी संदेश नेहाने आपल्या यशातून दिला आहे.

नेहा बसोने हिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आलोक महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष नरेंद्रकुमार लिल्हारे, आलोक महाराष्ट्र प्रदेश संयोजक रोशनलाल लिल्हारे, ज्ञानीराम बनोठे, राष्ट्रीय वरिष्ठ महिला उपाध्यक्ष सुखवंता बनोठे, भोजवंती लिल्हारे, लोधी समाज सेवा समिती आमगावचे अध्यक्ष प्राध्यापक जागेश्वर लिल्हारे, देवेंद्र मच्छिरके, केवलचंद मच्छिरके, युवराज बसोने, आलोक महाराष्ट्र प्रदेश मीडिया प्रभारी राजकुमार बसोने, तोशलाल लिल्हारे, रोशन गराडे आणि कृष्ण गयगये यांनी नेहाला हार्दिक अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच कुटुंबीय, शिक्षक, मित्रपरिवार आणि शुभचिंतकांनीही नेहाच्या या यशाचे कौतुक करत तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

नेहा बसोनेच्या या अभिमानास्पद यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या यशाने गोंदिया जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे.

## मकोकातील फरार कुख्यात संघर्ष बागडे प्रोडक्शन वॉरंटवर पोलिसांच्या जाळ्यात

### दगडी चाळ गँगवार प्रकरण, पाच दिवसांची कोठडी

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

स्थानिक मुख्य बाजारपेठेत घडलेल्या बहुचर्चित दगडी चाळ गँगवार प्रकरणातील फरार असलेला मकोकाचा कुख्यात आरोपी संघर्ष बागडे वय १९, रा. इंदिरानगर झोपडपट्टी, खापरखेडा याला अखेर खापरखेडा पोलिसांनी ममोका न्यायालयातून प्रोडक्शन वॉरंटवर २९ सप्टेंबर मंगळवारला ताब्यात घेतले आहे कुख्यात आरोपी संघर्ष बागडे याला मकोका न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला ३ ऑक्टोबरपर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



खापरखेडा मुख्य बाजारपेठेत २ ऑगस्ट रोजी दगडी चाळ टोळीने दहशत माजवत रक्तरंजित गँगवार घडवून आणले होते या घटनेनंतर पोलिसांनी टोळीचा मुख्य म्होरक्या सूरज कावळे, संघर्ष बागडे, शुभम उर्फ शेरू उईके, साहिल उर्फ बुटऱ्या बागडे यांच्यासह १३ जणांविरुद्ध विविध कलमांसह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई केली होती या प्रकरणातील ९ आरोपी सध्या मध्यवर्ती कारागृहात असून अल्पवयीन आरोपी बालसुधारगृहात आहेत. मात्र, मुख्य सूत्रधार सूरज कावळे, शुभम यर्फ शेरू उईके, साहिल उर्फ बूटऱ्या बागडे, संघर्ष बागडे व त्याचे साथीदार घटनेनंतर फरार झाले होते. गँगवारनंतर खापरखेडा पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फरार झालेला कुख्यात आरोपी संघर्ष बागडे फरारी काळात घरफोडी गुन्ह्यात सक्रिय होता.

हुडकेश्वर व एमआयडीसी हिंगणा व वर्धा जिल्ह्यात घरफोड्यांचे सत्र सुरू होते अखेर २२ सप्टेंबरच्या रात्री हुडकेश्वर पोलिसांच्या डीबी पथकाने अमरावती जिल्ह्यातील धानोरा येथे धाड टाकून संघर्ष बागडे व त्याचा साथीदार ऋषिकेश मानकर या दोघांना बेड्या ठोकल्या होत्या. जिल्ह्यात गणेश विसर्जन बंदोबस्ताचा मोठा ताण असल्याने आरोपीला तत्काळ ताब्यात घेणे खापरखेडा पोलीसांना शक्य झाले नव्हते विसर्जन बंदोबस्त आटोपताच मकोका प्रकरणाचे तपास अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त अंकुश खेडकर यांनी न्यायालयात अर्ज करून प्रोडक्शन वॉरंट मिळवला २९ सप्टेंबर रोजी खापरखेडा पोलिसांनी संघर्ष बागडेला ताब्यात घेऊन मकोका न्यायालयात हजर केले. न्यायालयाने ३ ऑक्टोबर पर्यंत पाच दिवस पोलीस कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले.

संघर्ष बागडे पोलीस कोठडी मिळाल्यामूळे दगडी चाळ गँगवार प्रकरणातील मुख्य सूत्रधार सूरज कावळे, शुभम उर्फ शेरू उईके आणि साहिल उर्फ बुटऱ्या बागडे या अद्याप फरार असलेल्या आरोपींचे ठावठिकाणे समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त अंकुश खेडकर व खापरखेडा पोलीस या दिशेने कसन चौकशी करत असून घटनेतील प्रमुख आरोपी लवकरच जेरबंद होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.